दैनिक सिंहवाणी वृत्त

प्रखर लेखणीचा साक्षीदार

वसुबारस शुभेच्छा

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : गुरूवार, ५ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३२६ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...

नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...

- आजच संपर्क करा -

८६९८७८८६६६

९६५७२३२०२६

केरळ सरकारचे ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात चौकशीचे आदेश

वृत्तसंस्था, तिरुवनंतपुरम

केरळचे गृहमंत्री रमेश चेन्निथला यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर लाच मागितल्याच्या आरोपांची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. हे प्रकरण सुमारे २० वर्षे जुन्या रस्ता बांधकाम प्रकल्पाशी संबंधित आहे. त्यावेळी ज्ञानेश कुमार राज्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव होते.

कोल्लम येथील कंत्राटदार साजन यांनी दक्षता विभागाकडे तक्रार दाखल केली आहे. त्यांचा आरोप आहे की, केरळ स्टेट ट्रान्सपोर्ट प्रोजेक्ट अंतर्गत काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे



भुगतान जारी करण्याच्या बदल्यात ज्ञानेश कुमार यांनी २ कोटींची लाच मागितली होती.

काय होते संपूर्ण प्रकरण ?

साजन यांच्या म्हणण्यानुसार, अभियंत्यांनी सुमारे १७ कोटींची बिले मंजूर केली होती; मात्र ज्ञानेश कुमार यांनी देयकांचे धनादेश अडवून ठेवले. त्यामुळे मलेशियन कंपनी PXATIY-BEL, तिचे कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला.

साजन यांनी तक्रारीत सांगितले की, कंपनीचे प्रकल्प अभियंता ली सी बीन यांनी त्यांना सांगितले होते की, ज्ञानेश कुमार लाच घेतल्याशिवाय देयकांचे धनादेश जारी करत नाहीत. साजन यांनी पैसे देऊन प्रकरण मिटवण्याची तयारी दर्शवली; मात्र कंपनीच्या अधिका-यांनी लाच देण्यास नकार दिला. कंत्राटदार आणि कर्मचाऱ्यांची थकबाकी चुकती करण्यासाठी ली यांनी बंगळुरूमधील कंपनीच्या अन्य प्रकल्पातून पैसे घेतले होते.

साजन यांनी आरोप केला की, पैसे न मिळाल्यामुळे आणि लाच मागितल्यामुळे ली यांनी २००६ मध्ये आत्महत्या केली होती. त्यांच्या म्हणण्यानुसार, ली यांनी आत्महत्येच्या चिठ्ठीत ज्ञानेश कुमार यांचे नाव लिहिले होते. मलेशियात राहणाऱ्या ली यांच्या कुटुंबीयांनीही कंपनीच्या कर्मचाऱ्यांना याची माहिती दिली होती.

साजन यांनी सांगितले की, यापूर्वी झालेल्या दक्षता चौकशीत त्यांच्याकडे आणि या प्रकरणाची माहिती असलेल्या इतर लोकांकडे चौकशी करण्यात आली नव्हती. त्यांनी सांगितले की, ते ली यांच्या कुटुंबीयांना, कंपनीच्या माजी कर्मचाऱ्यांना आणि इतर साक्षीदारांना चौकशीसाठी हजर करू शकतात.

जनतेत फूट पाडणारे राजकारण मतदारांनी नाकारले



वृत्तसंस्था, वॉशिंग्टन

अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकांमध्ये रिपब्लिकन पक्षाला बसलेल्या धक्क्यानंतर, माजी राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांनी याला अमेरिकन जनतेचा एक स्पष्ट संदेश म्हटले आहे. ओबामा म्हणाले की, मतदारांना असे राजकारण हवे आहे जे लोकांमध्ये फूट पाडण्याऐवजी त्यांना एकत्र आणेल. जनतेला असे नेते हवे आहेत जे त्यांच्या दैनंदिन समस्यांवर ठोस उपाययोजनी करू शकतील.

अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकांचे निकाल मंगळवारी रात्री जाहीर झाल्यानंतर एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ओबामा म्हणाले की हे निकाल राजकारणातील बदलासाठी अमेरिकन जनतेची इच्छा स्पष्टपणे दर्शवतात. अमेरिकन मतदारांनी विभाजनकारी राजकारण नाकारले आहे. त्यांनी याचे वर्णन एकत्रितपणे काम करणाऱ्या शासनप्रणालीची, ठोस उपायांची आणि लोकांना प्राधान्य देणाऱ्या नेतृत्वाची मागणी असे केले.

ओबामा यांनी विविध मतदारसंघांमधून निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची प्रशंसा केली. ते म्हणाले की, देशाच्या प्रत्येक प्रदेशात, अगदी डेमोक्रॅटिक उमेदवारांसाठी पूर्वी कठीण मानल्या जाणाऱ्या भागांमध्येही, सशक्त उमेदवार पुढे आल्यामुळे हा निकाल शक्य झाला. ओबामांच्या मते, या उमेदवारांची पार्श्वभूमी वेगवेगळी होती आणि राजकीय विचारही भिन्न होते, परंतु ते समान मूल्ये, लोकसेवेवरील विश्वास आणि आपल्या मतदारसंघातील लोकांना प्राधान्य देण्याच्या वचनबद्धतेने एकत्र आले होते.

माजी राष्ट्रपतींनी निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी मदत करणाऱ्या हजारो निवडणूक अधिकारी आणि स्वयंसेवकांचेही आभार मानले. ते म्हणाले की दोन्ही राजकीय पक्षांच्या अधिकाऱ्यांनी आणि स्वयंसेवकांनी निवडणुकीच्या यशात योगदान दिले.

थोडक्यात

कॅनव्हाच्या कर्मचाऱ्यांना दिला नारळ

नवी दिल्ली : तंत्रज्ञान क्षेत्रात खळबळ उडाली असून रोज वेगवेगळ्या कंपन्यांमधून नोकर कपात केली जात आहे. त्यामुळे नोकरदार वर्गाच्या डोक्यावर Layoff ची टांगती तलवार कायम आहे. याआधी मायक्रोसॉफ्ट, मेटा, डेल, अमेझॉन यांसारख्या नामांकित कंपन्यांनी नोकर कपात केली असून आता कॅनव्हा या लोकप्रिय डिझाईन प्लॅटफॉर्मने नोकरकपात करण्याचा निर्णय घेतला आहे. नुकतीच त्यांच्या एकूण कर्मचाऱ्यांपैकी २२ टक्के म्हणजेच तब्बल १,२७१ कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या परिणामाबद्दल आपण अत्यंत दिलगीर असल्याचे सीईओ मेलानी पर्किन्स यांनी एका अंतर्गत मेमोमध्ये म्हटले आहे.

२५% अग्निवीर नियमित सैनिक बनणार

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

दिवाळीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने अग्निवीरांसाठी सेवा मुदतवाढ योजना जाहीर करून एक मोठी भेट दिली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार, २५% अग्निवीर नियमित सैनिक म्हणून नियुक्त केले जातील, तर उर्वरित ७५% अग्निवीरांना दोन वर्षांची सेवा मुदतवाढ दिली जाईल. यामुळे या अग्निवीरांचा सेवा कालावधी चार वर्षांवरून सहा वर्षांपर्यंत वाढणार आहे अशी माहिती चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी आज दिली.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सीडीएस जनरल एन. एस. राजा सुब्रमणी म्हणाले, १४ जून २०२२ रोजी अग्निपथ योजना सुरू करण्यात आली होती. आजचा दिवस भारतीय संरक्षण दल आणि आपल्या अग्निवीरांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. मंत्रिमंडळाने सर्व अग्निवीरांसाठी भारतीय संरक्षण दलात सामील होण्याचा मार्ग मोकळा केला आहे असेही चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांनी सांगितले.

अग्निवीरांना दोन वर्षांची मुदतवाढ दिली जाईल. त्यांना त्यांच्या कामगिरीच्या मूल्यमापनाच्या आधारे भविष्यात कायमस्वरूपी पदे मिळण्याची संधी मिळू शकते. तसेच त्यांना वाढीव वेतन आणि भत्ते मिळतील. त्यांच्या कामगिरीचे सातत्याने मूल्यमापन केले जाईल. याचा वेळोवेळी आढावा घेतला जाईल. आता अग्निवीरांची पहिली तुकडी आपला चार वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्याच्या टप्प्यावर आहे.



लोकशाही वाचवा अराजकता हटवा..



चलो यशवंत स्टेडियम !
चलो यशवंत स्टेडियम !!

मा. मुख्यमंत्री
श्री देवेंद्रजी फडणवीस

मा. केंद्रीय मंत्री
श्री नितिनजी गडकरी

मा. महसूल मंत्री
श्री चंद्रशेखरजी बावनकुळे

यांच्या नेतृत्वात

विशाल पदयात्रा

5 गुरुवार दि. नोव्हेंबर 2026 ला दुपारी 3.00 वा.

यशवंत स्टेडियम ते संविधान चौक नागपूर

सर्व देशप्रेमी बंधुंनो
लोकशाहीच्या रक्षणासाठी या
विशाल पदयात्रेत
हजारोंच्या संख्येत सहभागी व्हा...



लोकतंत्र बचाओ

राष्ट्रीय लोकशाही आघाडी (विदर्भ विभाग)

संपादकीय लेखणीतून...

मिर्झा आणि संदेश

दिवाळीत फटाके फोडण्याऐवजी पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरा करण्याचे आवाहन करण्यासाठी मुंबई महापालिकेने सुरू केलेल्या सेलिब्रिटी मोहिमेला आता राजकीय वळण लागले आहे. अभिनेत्री माधुरी दीक्षित, स्वप्नील जोशी आणि क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे यांच्यासह अभिनेत्री दिया मिर्झा हिनेही मुंबईकरांना फटाके न फोडण्याचे आवाहन केले होते. मात्र, दिया मिर्झाचा व्हीडीओ महापालिकेच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावर प्रसिद्ध होताच भाजपने त्यावर आक्षेप घेतला. त्यानंतर महापालिकेने हा व्हीडीओ हटविल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. दिया मिर्झा हिने स्वत:हून महापालिकेला कोणतेही मानधन न घेता हा व्हीडीओ पाठवला होता. पालिकेच्या विनंतीनंतर तिने हा संदेश रेकॉर्ड करून पाठविल्याचे सांगितले जाते. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.२५ वाजता महापालिकेच्या अधिकृत एक्स खात्यावर हा व्हीडीओ प्रसिद्ध करण्यात आला. दिवाळी साजरी करताना पर्यावरण आणि आरोग्याची काळजी घ्यावी. फटाक्यांमुळे होणारे प्रदूषण सर्वांसाठी हानिकारक आहे. त्यामुळे आवाजाऐवजी आनंदाने दिवाळी साजरी करा, असे आवाहन दिया मिझाने केले होते. मात्र मुंबई भाजपचे अध्यक्ष आमदार अमित साटम यांनी सोशल मीडियावर या आवाहनाला आक्षेप घेतला.

दिया मिर्झाकडून दिवाळी कशी साजरी करावी, याचे धडे घेण्याची मुंबईकरांना गरज नाही. आपल्या परंपरा आणि संस्कृती खोलवर रुजल्या आहेत, अशी भूमिका अमित साटम यांनी मांडली. त्यानंतर महापालिकेने आपल्या सोशल मीडिया खात्यावरून दिया मिर्झाचा व्हीडीओ हटवला. या प्रकरणात मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनीही नाराजी व्यक्त केली. दिया मिर्झा हिंदुत्वविरोधी असून तिच्या पूर्वीच्या काही भूमिकांचा उल्लेख महापौरांनी केला. नर्मदा प्रकल्प, समान नागरी कायदा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या एका विधानाबाबत तिने यापूर्वी विरोधी भूमिका घेतल्याचा दावा रितू तावडे यांनी केला. महापालिकेच्या अधिकृत माध्यमांवरून प्रसिद्ध होणाऱ्या संदेशांची माहिती महापौरांना आधी देण्यात यावी.

यापुढेही कोणत्याही सेलिब्रिटीची निवड करण्यापूर्वी त्यांची नावे आपल्याला कळवावीत, अशी सूचना त्यांनी प्रशासनाला केली. तसेच आपल्या मान्यतेशिवाय महापालिकेने कोणतेही सार्वजनिक विधान करू नये, असेही त्या म्हणाल्या. उपमहापौर संजय घाडी यांनी या आक्षेपांपेक्षा वेगळी भूमिका मांडली. फटाके टाळण्याचे आवाहन करण्यात दिया मिझानें काहीही चुकीचे सांगितले नाही. मग तिचा व्हीडीओ हटविण्याची गरज काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मी केलेला व्हीडीओ प्रदूषणमुक्त दिवाळीसाठी होता. त्यामध्ये टीका करण्यासारखे नेमके काय आहे? मुंबई उच्च न्यायालयाने प्रदूषणाबाबत जनजागृतीसाठी महापालिकेला निर्देश दिले आहेत. त्यामुळे लोकांमध्ये जनजागृतीच्या उद्देशाने मी तो व्हीडीओ केला होता. प्रदूषण कमी व्हावे आणि लोकांचे आरोग्य योग्य रहावे, यासाठी तो व्हीडीओ केला होता, त्यात खटकण्यासारखे काहीच नव्हते, असे प्रत्युत्तर दिया मिझानें दिले. शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनीही या प्रकरणावरून महापौर आणि सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले. महापालिकेने एका व्यक्तीला अधिकृतपणे व्हीडीओ करण्याची विनंती केली, त्या व्यक्तीने व्हीडीओ तयार करून पाठविला. यानंतर सत्ताधारी पक्षाच्या आमदाराने तो हटविण्याची मागणी केली.

महापौरांनी नाराजी व्यक्त केली आणि अखेर व्हीडीओ हटविण्यात आला. त्यावर आदित्य ठाकरे यांनी महापौरांच्या वाहनावरील लाल दिवा आणि अधिकृत निवासस्थानावरील खर्चासंबंधीच्या पूर्वीच्या वादांचाही उल्लेख करत महापालिकेच्या कारभारावर प्रश्न उपस्थित केले. भाजपचे काही नेते सर्व मार्ग बंद झाल्यावर कुतल्याही वादाला हिंदू-मुस्लिम वादाचा रंग देऊन जनतेचे चित्त महागाई, बेरोजगारी अशा सर्व प्रश्नांपासून विचलित करतात. भाजपचे नेते मंत्री नितेश राणे यांनी दिवाळीत मुस्लिम दुकानदारांकडून खरेदी करू नका, हिंदू दुकानदारांकडून खरेदी करा असा फतवा काढला. साटम यांना दिया मिर्झाचे आवाहन खटकले. साटम आणि राणे यांनी दिवाळीच्या तोंडावर हिंदू-मुस्लिम वादाची वात पेटवण्याचे मुख्य कारण म्हणजे, देशात सध्या ज्ञानेश कुमार प्रकरणावरून इंडिया आघाडी व सीजेपी यांनी सुरू केलेली आंदोलने व त्याला होणारी गर्दी! साटम, राणे यांची सारी धडपड लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठीच आहे. महागाई, बेरोजगारी, निवडणुकांमधील पराभव, पर्यावरणाची हानी आणि सर्व प्रश्नांपासून लोकांचे लक्ष विचलित करण्यासाठीचा हा सारा खटाटोप आहे. दुष्काळ असला तरी जमेल तशी दिवाळी आनंदात साजरी करावी लागणार आहे. तेव्हा आनंदात गुणगुणू या, जिया बेकरार है, छायी बहार है, आजा मोरे बालमा, तेरा इंतजार है!



प्रँकचा अतिरेक नको

लीलाधर दवंडे कामठी (नागपूर)

समाज माध्यमांवरील वाढता प्रभाव आणि प्रँकच्या नावाखाली हल्ली कुणाचीही करण्यात येणारी थट्टा- मस्करी किंवा छेडखाणी यामुळे कधी गंभीर प्रसंग उद्भवू शकतात. केवळ मनोरंजन म्हणून केलेली अशी मस्करी एखाद्याच्या अडचणीचे कारण ठरू शकते, कुणाच्या हृदयाघाताचे कारण ठरू शकते. त्यामुळे समाज माध्यमांचा वापर करतांना सामाजिक जबाबदारीचे भान ठेवणे आवश्यक आहे.

प्रँकच्या नावाखाली कुणालाही नाहक त्रास देणे महागात पडू शकते. अशा प्रकारांत कायद्याचे उल्लंघन झाल्यास तुरुंगाची हवा सुद्धा खावी लागू शकते, असा इशारा नुकतेच सिन्नर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमकुमार दांडेकर यांनी एका विद्यालयात मार्गदर्शन करतांना दिला.

दांडेकर यांच्या पावलावर पाऊल ठेवत आता असा इशारा देशात सर्वत्र द्यायला हवा. कारण, समाजमाध्यमांवर आपले अस्तित्व निर्माण करणे आणि टिकवून ठेवणे यासाठी लाईक्स आणि विव्हस्च्या आकर्षणामुळे समाज माध्यमांवर वावरणाऱ्या कित्येकांनी मर्यादा ओलांडल्याचे चित्र आपणास बघावला मिळते आहे. रिल्स आणि सेल्फीच्या नादात कित्येकांनी आपला जीव गमावला असतांना आता प्रँक नावाचं भूत अनेकांच्या मानगुटीवर बसलेलं आहे. नकली साप किंवा एखाद्या जंगली श्वापदांची हुबेहूब प्रतिकृती ठेवून चालत्या व्यक्तीला तसेच कुठे निवांत बसलेल्या व्यक्तीला घाबरवतांना अशी ओळख नसतांना सुद्धा थट्टा करणारे महाभाग निव्वळ पैसे कमावण्याच्या नादात दुसऱ्यांच्या जीवाची पर्वा सुद्धा करत नसतात.

अचानक घडलेल्या अशा प्रसंगात एखाद्याला रक्तचापाचा त्रास असेल त्याची काय दशा होईल याचा देखिल विचार करत नाहीत. एखाद्याला हृदयाघात होऊन मृत्यू ओढवेल याची भीती सुद्धा या लोकांना नसते.

भुताचे कपडे घालून मुलांना घाबरविणे म्हणजे त्यांच्या मनात भीती आणि अंधश्रद्धा निर्माण करणे नव्हे काय? रस्त्यावरून चालणाऱ्या मुलींना छेडून नंतर हा प्रँक असल्याची बतावणी करत कॅमेराकडे बोट दाखवणे यास मनोरंजन म्हणता येईल काय? एखाद्या अनोळखी व्यक्तीला लिफ्टमध्ये एकटे गाठून नाचण्यास भाग पाडणे किंवा घाबरविणे हे तर रॅगिंग घेतल्यासारखे आहे.

बघणाऱ्यांना हसू येत असले तरी ज्यांच्यावर ही परिस्थिती ओढवते त्यांना कसे वाटत असेल याकडे मात्र दुर्लक्ष करू नये. काही प्रँक विनोदी असतात, ते समजू शकतो. पण, ज्यांच्यामुळे माणसाची घाबरगुंडी उडते त्यात संबंधित व्यक्तीच्या जीवाला हानी सुद्धा पोहचू शकते. त्यामुळे एक मनोरंजन म्हणून प्रँकची थट्टा मस्करी ठिक असली तरी त्याचा अतिरेक मात्र नको.

- ८४१२८७७२२०

दिखाव्याच्या युगात त्यागाचे तेज : करवा चौथच्या व्रतापलीकडील खऱ्या प्रेमाचा आदर्श

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

आजच्या धावपळीच्या आणि समाजमाध्यमांच्या जगात अनेक सण, उत्सव आणि व्रतवैकल्ये आपल्या मूळ अर्थापासून दुरावत चालली आहेत. करवा चौथसारखे व्रतही आजकाल केवळ एक फॅशन किंवा प्रतिष्ठेचे लक्षण बनले आहे. महागड्या साड्या, आकर्षक सजावट आणि केवळ लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी काढलेली छायाचित्रे यातच या व्रताचे स्वरूप अडकल्याचे अनेकदा पाहायला मिळते. सणांमागील मूळ गाभा, त्याग आणि समर्पणाची भावना या दिखावेबाजपणाच्या गर्दीत कुठेतरी हरवत चालली आहे. परंतु, याच उथळ प्रदर्शनाच्या काळात मध्य प्रदेशातील जबलपूर येथून समोर आलेली एक घटना समाजाच्या डोळ्यांत अंजन घालणारी आणि खऱ्या प्रेमाची जिवंत व्याख्या सांगणारी ठरली आहे.

जबलपूर येथील रश्मी गुप्ता आणि त्यांचे पती दीपक गुप्ता यांच्या आयुष्यातील हा प्रसंग कोणत्याही चित्रपटाला लाजवेल असा वास्तववादी आणि हृदयस्पर्शी आहे. दीपक हे गेल्या २ वर्षांपासून किडनीच्या अत्यंत गंभीर आजाराशी झुंज देत होते. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत होती आणि त्यांना सतत डायलिसिसवर राहावे लागत होते. आपल्या पतीला अशा असह्य वेदनांमधून जाताना पाहणे कोणत्याही पत्नीसाठी क्लेशदायक असते. रश्मी यांनी केवळ अश्रू ढाळत बसण्याऐवजी पतीचे प्राण वाचवण्यासाठी आणि त्यांना पुन्हा एकदा निरोगी आयुष्य देण्यासाठी एक अतिशय धाडसी निर्णय घेतला. त्यांनी स्वत:ची एक किडनी आपल्या पतीला दान करण्याचे निश्चित केले.

सर्व वैद्यकीय आणि कायदेशीर चाचण्या पूर्ण झाल्यानंतर, जबलपूर येथील मेट्रो प्राइम रुग्णालयात २५ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया पार पडली. सुदैवाने, डॉक्टरांच्या शर्थीच्या प्रयत्नांना यश आले आणि ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया पूर्णपणे यशस्वी ठरली. या संपूर्ण कथेतील सर्वात भावुक आणि अंगावर काटा आणणारा क्षण शस्त्रक्रियेनंतर लगेचच पाहायला मिळाला. शस्त्रक्रियेनंतर लगेचच करवा चौथचा सण आला. या काळात हे दोन्ही पती-पत्नी रुग्णालयात उपचार घेत होते. भारतीय परंपरेत पत्नी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी या दिवशी निर्जळी उपवास करते. स्वतः नुकत्याच एका मोठ्या शस्त्रक्रियेला सामोरे गेलेल्या रश्मी यांनी आपल्या शारीरिक वेदना आणि थकवा बाजूला सारत, चक्क रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात करवा चौथची पूजा केली आणि आपला उपवास सोडला.

चंद्रदर्शन झाल्यानंतर त्यांनी अतिदक्षता कक्षात उपचार घेत असलेल्या आपल्या पतीचा चेहरा चाळणीतून पाहिला आणि त्यांच्या निरोगी, दीर्घायुष्यासाठी ईश्वराकडे प्रार्थना केली. डोळ्यांत पाणी आणि चेहऱ्यावर पतीला जीवदान दिल्याचा आनंद, असा हा विलक्षण प्रसंग कॅमेऱ्यात कैद झाला आणि तो समाजमाध्यमांवर प्रचंड वेगाने पसरला. या घटनेकडे केवळ पती-पत्नीचे प्रेम म्हणून न पाहता, कुटुंब व्यवस्था टिकवणारी एक मोठी शक्ती म्हणून पाहणे गरजेचे आहे. लग्नात घेतलेले वचन खऱ्या अर्थाने कसे निभवायचे, हे रश्मी यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. जेव्हा आजारासारखे मोठे संकट उभे राहते, तेव्हा सारा दिखाऊपणा गळून पडतो आणि उरते ती फक्त एकमेकांची खरी साथ. स्वतःच्या शरीराचा एक अवयव काढून देणे हा खऱ्या अर्थाने सर्वोच्च त्याग आहे.

करवा चौथला पतीच्या दीर्घायुष्यासाठी उपवास केला जातो, पण रश्मी यांनी केवळ अन्नाचा त्याग केला नाही, तर पतीचे आयुष्य खऱ्या अर्थाने वाढवण्यासाठी स्वतःचा अवयव दिला. खरा उपवास आणि खरी प्रार्थना तीच असते, जी संकटाच्या वेळी आपल्या जोडीदारासाठी ढाल बनून उभी राहते. पाश्चात्य देशांच्या तुलनेत भारतीय कुटुंब व्यवस्था आजही जगभरात तिच्या भक्कमपणासाठी ओळखली जाते. या व्यवस्थेचा पाया पैशांवर, दिखाव्यावर किंवा केवळ कागदी करारांवर उभा नसून तो एकमेकांसाठी केलेल्या निस्वार्थ त्यागावर आणि समर्पणावर उभा आहे. संकटाच्या वेळी एक पाऊलही मागे न घेता, सर्वस्व पणाला लावून कुटुंबाला वाचवण्याची ही वृत्तीच आपल्या कुटुंब व्यवस्थेला जिवंत ठेवते. सण आणि व्रत ही केवळ कपडे आणि दागिन्यांची सजावट नसून ती मनाची आणि नात्यांची सजावट आहे, हाच मोठा धडा या घटनेतून संपूर्ण समाजाला मिळतो. आजच्या आधुनिक आणि दिखावेबाजपणाच्या युगात जिथे नातेसंबंध सोशल मीडियाच्या लाईक्स आणि भौतिक सुखांवर मोजले जातात, तिथे खरे प्रेम आणि त्याग शोधणे दुर्मिळ झाले आहे. अशा काळात, भारतीय कुटुंब व्यवस्था हा या दोन्ही मूल्यांचा सर्वात भक्कम पाया आणि आदर्श म्हणून जगासमोर उभा आहे.जबलपूर येथील रश्मी गुप्ता यांनी आपल्या पतीला किडनी दान करून आणि शस्त्रक्रियेनंतरही करवा चौथचे व्रत श्रद्धेने पूर्ण करून प्रेम, त्याग आणि समर्पणाचा एक अनोखा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. त्यांच्या कृतीतून हे स्पष्ट होते की, खऱ्या प्रेमाची अभिव्यक्ती महागड्या भेटवस्तूंमध्ये, दागिन्यांच्या झगमगाटात किंवा समाजमाध्यमांवरील छायाचित्रांत नसते, तर संकटाच्या क्षणी एकमेकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्यात असते.

सण, उत्सव आणि व्रतवैकल्यांचे महत्त्व त्यांच्या बाह्य प्रदर्शनात नसून त्यामागील भावनेत दडलेले असते. भारतीय कुटुंबव्यवस्थेची खरी ताकदही याच निस्वार्थ प्रेमात, विश्वासात आणि परस्पर त्यागात आहे. त्यामुळे आजच्या दिखावेबाज आणि स्वार्थप्रधान होत चाललेल्या समाजाने या घटनेतून नात्यांचे खरे मूल्य समजून घेण्याची गरज आहे. कारण नाती दिखाव्याने मोठी होत नाहीत, ती त्यागाने आणि समर्पणाने अधिक दृढ होतात. हाच भारतीय कुटुंबसंस्कृतीचा खरा वारसा आहे.

- ९५६१५९४३०६

ग्लेन मॅक्सवेलचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटला गुडबाय!

मैदानावरील बिग शोची आंतरराष्ट्रीय कारकीर्द संपली

डॉ.दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

क्रिकेटच्या मैदानावर कधी वादळी फलंदाजी, कधी उपयुक्त गोलंदाजी, तर कधी अविश्वसनीय क्षेत्ररक्षणाच्या जोरावर सामन्याचे चित्र पालटणारा ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू ग्लेन मॅक्सवेल आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये दिसणार नाही. आपल्या आक्रमक आणि अनपेक्षित खेळाने प्रतिस्पर्धी संघांची झोप उडवणाऱ्या या बिग शोने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधूनही निवृत्ती घेतली आहे. यापूर्वी जून २०२५ मध्ये त्याने एकदिवसीय क्रिकेटला अलविदा केला होता. त्यामुळे त्याच्या आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील प्रदीर्घ प्रवासावर आता पडदा पडला आहे. मॅक्सवेलची निवृत्ती ही केवळ एका खेळाडूची कारकीर्द संपण्याची घटना नाही, तर आधुनिक मर्यादित षटकांच्या क्रिकेटला नवी ओळख देणाऱ्या एका अनोख्या शैलीच्या खेळाडूचा निरोप आहे. मात्र, क्रिकेटप्रेमींसाठी दिलासादायक बाब म्हणजे तो फ्रँचायझी क्रिकेटमध्ये खेळताना दिसणार आहे.

आकडेवारीतून मॅक्सवेलची अष्टपैलू कामगिरी

मॅक्सवेलने २०१२ मध्ये पाकिस्तानविरुद्ध टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले. तब्बल १४ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीत त्याने १३० टी-२० सामने खेळून २,८९७ धावा केल्या. त्याचा १५४.४२ चा स्ट्राइक रेट त्याच्या आक्रमक फलंदाजीची साक्ष देतो. पाच शतके आणि १२ अर्धशतके त्याच्या नावावर आहेत. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाच शतके करणाऱ्या खेळाडूंमध्ये भारताचा रोहित शर्मा आणि मॅक्सवेल यांचा समावेश आहे. ऑस्ट्रेलियासाठी या प्रकारात सर्वाधिक धावा करणाऱ्यांमध्ये तो तिसऱ्या क्रमांकावर आहे.

त्याची एकदिवसीय कारकीर्दही तितकीच प्रभावी ठरली. १४९ सामन्यांत ३,९९० धावा, १२६.७० चा स्ट्राइक रेट, चार शतके आणि २३ अर्धशतके अशी त्याची कामगिरी आहे. २०२३ च्या विश्वचषकात अफगाणिस्तानविरुद्ध मुंबईच्या वानखेडे मैदानावर केलेली नाबाद २०१ धावांची खेळी त्याच्या कारकिर्दीतील सुवर्णक्षण ठरली. पायाच्या स्नायूंच्या वेदनांनी त्रस्त असतानाही त्याने ऑस्ट्रेलियाला अशक्यप्राय विजय मिळवून दिला होता. एकदिवसीय विश्वचषकाच्या इतिहासातील ही सर्वाधिक संस्मरणीय खेळींपैकी एक मानली जाते.

कसोटी क्रिकेटमध्ये त्याला फारशी संधी मिळाली नाही. सात कसोटी सामन्यांत ३२९ धावा करताना त्याने २०१७ मध्ये भारताविरुद्ध रांची येथे १०४ धावांची एकमेव शतकी खेळी केली. गोलंदाजीतही त्याने आपली उपयुक्तता सिद्ध केली. एकदिवसीय सामन्यांत ७७, तर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत ५१ बळी घेतले. क्षेत्ररक्षणातही त्याने अनेक अविश्वसनीय झेल टिपले. एकूणच, फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण अशा तिन्ही आघाड्यांवर योगदान देणारा तो खऱ्या अर्थाने अष्टपैलू खेळाडू होता. आश्चर्याची बाब म्हणजे संपूर्ण कारकिर्दीत फलंदाजीवर जास्त जोर देणाऱ्या या खेळाडूने आपल्या कसोटी कारकिर्दीची सुरुवात एक गोलंदाज म्हणून केली होती.

तीन विश्वविजेतेपदांचा साक्षीदार!

मॅक्सवेलच्या कारकिर्दीचे महत्त्व केवळ वैयक्तिक आकडेवारीपुरते मर्यादित नाही. ऑस्ट्रेलियाने २०१५ आणि २०२३ मध्ये जिंकलेल्या एकदिवसीय विश्वचषक विजेतेपदाच्या संघात तो होता. २०२१ च्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचाही तो महत्त्वाचा सदस्य होता. त्यामुळे तीन विश्वविजेतेपदांचा आनंद अनुभवणाऱ्या मॅक्सवेलला ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या यशस्वी पर्वातील महत्त्वाचा शिलेदार म्हणावे लागेल.

त्याची फलंदाजी पारंपरिक क्रिकेटच्या चौकटीत कधीच अडकली नाही. रिव्हर्स स्वीप, स्विच हिट, अनपेक्षित फटके आणि मैदानाच्या कोणत्याही दिशेला चेंडू भिरकावण्याची क्षमता ही त्याची खासियत होती. गोलंदाजाने कितीही अचूक टप्प्यावर चेंडू टाकला तरी त्याला सीमापार पाठवण्याची क्षमता त्याच्यात होती. म्हणूनच



त्याला बिग शो ही उपाधी सार्थ ठरली.

निवृत्तीमागे दबाव नव्हे, तर भविष्याचा विचार!

मॅक्सवेलने 'द फायनल वर्ड' या क्रिकेटविषयक पॉडकास्टमध्ये आपल्या निवृत्तीमागील भूमिका स्पष्ट केली. टी-२० विश्वचषकाच्या आधी आणि नंतर निवड समिती व संघ व्यवस्थापनाशी त्याच्या भविष्याबाबत चर्चा झाली होती. मात्र, संघ व्यवस्थापनाकडून निवृत्ती घेण्यासाठी कोणताही दबाव नव्हता, असे त्याने स्पष्ट केले.

ऑस्ट्रेलियाला आगामी मालिकांमध्ये नव्या खेळाडूंना संधी देऊन भविष्यातील संघ बांधणी करायची होती. बांगलादेश दौऱ्यात नव्या खेळाडूंनी मिळालेल्या संधीचे सोने केले. त्यामुळे बदलत्या परिस्थितीचा विचार करून आपण आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून बाजूला होण्याचा निर्णय घेतल्याचे त्याच्या वक्तव्यातून स्पष्ट होते.

एमसीजीवरील निरोपाची इच्छा अपूर्ण!

मॅक्सवेलला आपल्या घरच्या मैदानावर म्हणजेच मेलबर्न क्रिकेट ग्राउंडवर (एमसीजी) अखेरचा आंतरराष्ट्रीय सामना खेळण्याची इच्छा होती. इंग्लंडविरुद्धच्या आगामी टी-२० मालिकेत मेलबर्न येथे सामना होणार असल्याने त्याला निरोपाचा सामना खेळण्याची आशा होती. मात्र, ऑस्ट्रेलियाच्या निवड समितीने इंग्लंडविरुद्धच्या संघात त्याला स्थान दिले नाही. त्यामुळे त्याची ही इच्छा अपूर्ण राहिली. गेल्या १५ वर्षांपासून टी-२० क्रिकेट हे आपले घर असल्याची भावना व्यक्त करताना मॅक्सवेलने मेलबर्नमध्ये संस्मरणीय निरोप समारंभाची अपेक्षा असल्याचे सांगितले. मात्र, नव्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय अनुभव देण्याच्या संघ व्यवस्थापनाच्या भूमिकेचाही त्याने आदर केला.

आता लक्ष बिग बॅश आणि फ्रँचायझी क्रिकेटवर!

आंतरराष्ट्रीय क्रिकेटला निरोप दिला असला तरी मॅक्सवेलची क्रिकेटची बॅट पूर्णपणे म्यान होणार नाही. त्याने लिस्ट ए आणि प्रथमश्रेणी क्रिकेटमधूनही निवृत्ती घेतली आहे. मात्र, मेलबर्न स्टार्सकडून बिग बॅश लीगमध्ये खेळणे तो सुरू ठेवणार आहे. या संघासोबत त्याचा करार २०२७-२८ हंगामापर्यंत आहे. आयपीएलसह अन्य टी-२० फ्रँचायझी स्पर्धांमध्येही त्याच्या सहभागाची शक्यता कायम आहे. गुडघ्याच्या दुखापतीतून पूर्णपणे सावरण्यासाठी त्याला आठ आठवड्यांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील जबाबदाऱ्यांपासून मुक्त होऊन उर्वरित क्रिकेट कारकीर्द अधिक चांगल्या तंदुरुस्तीत खेळण्याचा त्याचा प्रयत्न असेल.

चौकट मोडणाऱ्या खेळाडूचा निरोप!

क्रिकेटमध्ये अनेक खेळाडू विक्रम करतात, काही सामने जिंकून देतात, तर काही खेळाडू खेळण्याची पद्धतच बदलून टाकतात. ग्लेन मॅक्सवेल हा तिसऱ्या प्रकारातील खेळाडू होता. त्याने केवळ धावा केल्या नाहीत, तर मर्यादित षटकांच्या क्रिकेटमध्ये फलंदाजीच्या कल्पनाशक्तीला नवी दिशा दिली. अशक्य वाटणारे फटके शक्य करून दाखवताना त्याने क्रिकेटप्रेमींना अनेकदा थक्क केले. विशेष म्हणजे, त्याची कारकीर्द चढ-उतारांनी भरलेली होती. दुखापती, संघातील स्थानासाठी संघर्ष आणि खराब फॉर्म अशा अनेक आव्हानांचा सामना करूनही त्याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आपले वेगळे स्थान निर्माण केले. अफगाणिस्तानविरुद्धची द्विशतकी खेळी तर त्याच्या जिद्दीचे आणि प्रतिभेचे सर्वोत्तम उदाहरण ठरली.

मॅक्सवेलच्या निवृत्तीमुळे ऑस्ट्रेलियन क्रिकेटमधील एका बेधडक आणि मनोरंजक पर्वाचा अंत झाला आहे. त्याची जागा घेणारा खेळाडू कदाचित ऑस्ट्रेलियाला मिळेलही; पण मैदानावर क्षणाक्षणाला काहीतरी अनपेक्षित घडवून आणणारा बिग शो पुन्हा पाहायला मिळणे कठीणच!

धावा, बळी आणि विश्वविजेते पदपिक्षाही क्रिकेटला वेगळ्या पद्धतीने खेळण्याची प्रेरणा देणे, हीच ग्लेन मॅक्सवेलची सर्वात मोठी ओळख राहील!

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

पाणी टंचाईतील थकित बिले तातडीने देण्याचे निर्देश

रोजगार हमी मजूरीचे दरही वाढविण्याचा प्रस्ताव, दुष्काळ निवारण उपसमितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मायक्रो फायनान्सच्या सक्तीच्या वसुलीवर निर्बंध, आणखी १३ तालुक्यांचा समावेश शक्य



दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

पाणी टंचाई व पुरवठ्यासंदर्भात मागील दोन वर्षातील थकीत बिले आठ दिवसात देण्याचे निर्देश दुष्काळ निवारण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. रोजगार हमीच्या माध्यमातून व्हीबीजी रामजी अंतर्गत होणाऱ्या कामांच्या मजुरीचे दर वाढवण्याबाबत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून, आगामी १० दिवसांत यावर शासन निर्णय घेतला जाईल.

अपूर्ण जलजीवन मिशनची कामे, फळबाग संरक्षण आणि चारा जवळच्या जिल्ह्यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रश्न मार्गी लावण्याचा निर्णयही उपसमितीच्या आजच्या बैठकीत घेण्यात आला. दुष्काळ निवारणाबाबत राज्य सरकार अत्यंत गंभीर असून, इतर राज्यांच्या तुलनेत उत्तम नियोजन केले जात असल्याची माहितीही बावनकुळे यांनी दिली.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेऊन उपाययोजना करण्यासाठी नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे घेण्यात आली. रोजगारहमी व फलोत्पादन मंत्री भरत गोगावले, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जलसंपदा मंत्री गिरीष महाजन, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

मागील दोन वर्षांतील पाणीटंचाईच्या कामांचे थकीत पैसे तात्काळ अदा करण्यात यावे, अन्यथा शेतकरी विहिरी अधिग्रहित करू देणार नाहीत, असा कडक पवित्रा घेत सर्व थकीत रक्कम २० नोव्हेंबरपर्यंत अदा करण्याचे सक्त निर्देश बावनकुळे यांनी दिले. जलजीवन मिशनच्या कामांचा आढावा घेताना सुमारे ७५ टक्के कामे पूर्ण झाली असली, तरी उर्वरित २५ टक्के कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. पाच कोटी रुपयांच्या आतील योजनांसाठी तातडीने किमान ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याबाबत आणि आगामी तीन महिन्यांत केंद्र सरकारच्या अटींचे पालन करून नियोजन करण्याचे ठरवण्यात आले.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीत वाढ करण्यासोबतच, मनरेगा आणि डीपीडीसी योजनांचे एकत्रीकरण करुन पुनरावर्ती टाळण्याच्या सूचनाही बैठकीत करण्यात आल्या.

चारा टंचाईवर मात करण्यासाठी आता एका जिल्ह्याला दुसऱ्या जिल्ह्यात किंवा विभाग स्तरावर चारा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयातून जिल्ह्यांची चारा गरज भागवावी, असे स्पष्ट करण्यात आले. याशिवाय, गाळपेर जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना ज्वारी, मका, हरभरा आदी पिके घेण्यासाठी मंजुरी देण्यात आली आहे.

जे शेतकरी सरकारी, देवस्थान किंवा अन्य जमीन कसत असल्याने रेकॉर्डवर नाहीत. तरी प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या सुमारे चार ते पाच लाख शेतकरी कुटुंबांना केंद्र व राज्य सरकारच्या सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी एक विशेष मानक कार्यप्रणाली तयार करण्याच्या सूचनाही बावनकुळे यांनी दिल्या. फळबागांचे संरक्षण, नवीन पाणवट्यांचे पुनरुज्जीवन, आणि १३ दुष्काळी जिल्ह्यांच्या नवीन प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. १५ नोव्हेंबरपर्यंत ज्या तालुक्यांत दुष्काळ जाहीर करणे आवश्यक आहे, त्यांचा सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले.

मायक्रो फायनान्सच्या सक्तीच्या वसुलीवर निर्बंध

ग्रामीण भागातील मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या मनमानी वसुलीचा मुद्दा बैठकीत मांडण्यात आला. यावेळी मायक्रो फायनान्सच्या अध्यक्षांनाच बैठकीत बोलावून जाब विचारला. अनेक ठिकाणी मायक्रो फायनान्स कंपन्या नियमांचे उल्लंघन करून उत्पन्नाच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त कर्ज वाटप करत असल्याच्या तक्रारी नदिड, लातूरसह विविध भागांतून प्राप्त होत आहेत. दुष्काळसदृश परिस्थितीत मायक्रो फायनान्स कंपन्यांनी शेतकऱ्यांकडे किंवा महिलांकडे बळजबरीने किंवा दबाब आणून कर्जाची वसुली करू नये, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. बहुतांश कर्ज हे महिलांच्या नावावर असून त्यांची मर्यादा ५५ हजार रुपयांपर्यंत असून ती दोन वर्षांत परतफेडीची असते. मात्र दुष्काळामुळे वसुली शक्य नसताना सक्ती न करता, अशा कर्ज प्रकरणांचे नियमांनुसार पुनरुज्जीवन करण्यात यावे, असे निर्देश मायक्रो फायनांसला देण्यात आले आहेत.

थोडक्यात

माळी महासंघाच्या पूर्व विभागीय महासचिवपदी शंकरराव चौधरी यांची निवड

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर



माळी समाजाच्या संघटनात्मक बळकटीकरणासह समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या माळी महासंघाच्या पूर्व विभागीय महासचिवपदी शंकरराव भीमराव चौधरी यांची निवड करण्यात आली आहे. महासंघाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाखाली ही नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या निवडीमुळे संघटनेच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे, राष्ट्रीय सचिव रवींद्र अंबाडकर, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अरुण तीखे तसेच विभागीय अध्यक्ष मुकुंदराव पोटदुखे यांच्या सहकार्याने शंकरराव चौधरी यांची पूर्व विभागीय महासचिवपदी निवड करण्यात आली. त्यांच्या माध्यमातून पूर्व विभागात संघटनेचा विस्तार, समाज बांधवांशी संपर्क आणि विविध सामाजिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर दिला जाणार आहे.

२०२६ मध्ये ग्लोबल वन चॅम्पियनशिप शोकाई मार्शल आर्ट्स खेळाडू जिंकले



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नुकत्याच पार पडलेल्या ग्लोबल वन चॅम्पियनशिप २०२६ मध्ये, भारताच्या शोकाई मार्शल आर्ट्स, रियू क्यू शोरिन रियू कराटे-डोच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत ४ सुवर्ण आणि १ रौप्य पदक जिंकले. वीर सूरज गोडे (सेंट व्हिन्सेंट पलोटी स्कूल, बेसा), अश्वी पंकज रामटेके (सेंट व्हिन्सेंट पलोट्टी स्कूल, बेसा) आणि अर्णव मनीष वानखेडे (पोदार इंटरनॅशनल स्कूल, बेसा, नागपूर) यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीने शाळेचे आणि नागपूरचे नाव उज्ज्वल केले. खेळाडूंनी या यशाचे श्रेय त्यांचे पालक आणि प्रशिक्षक, सेन्सेई सूरज गोडे (ब्लॅक बेल्ट ६ वा डॅन) आणि सेन्सेई मोनल मालवी गोडे (ब्लॅक बेल्ट २ रा डॅन) यांच्या मार्गदर्शनाला आणि प्रशिक्षणाला दिले. शोकाई मार्शल आर्ट्स परिवार या कामगिरीबद्दल सर्व खेळाडूंचे अभिनंदन करतो.

समता नगर, बाबादीप नगर परिसरात अंधाराचे साम्राज्य, अन् खडतर रस्ते; महापालिकेच्या दुर्लक्षामुळे नागरिक त्रस्त

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

उत्तर नागपूर क्षेत्रातील आशी नगर झोन अंतर्गत येणाऱ्या समता नगर, बाबादीप नगर आणि आदिवासी ले आउटसह परिसरातील अनेक वस्त्यांमध्ये नागरिकांना मूलभूत सुविधांअभावी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. परिसरात पथदिवे बंद असल्यामुळे पसरणाऱ्या अंधारासोबतच, रस्त्यांची झालेली दुर्दशा आणि खड्ड्यांमुळे स्थानिक रहिवाशांचे जगणे बेहाल झाले आहे, अशी नागरिकांची तक्रार आहे.



या परिसरातील अनेक वस्त्यांमध्ये अजुनही पक्के रस्ते (सिमेंट/डांबरीकरण) तयार करण्यात आलेले नाहीत. ठिकठिकाणी पडलेले मोठे खड्डे आणि कच्च्या रस्त्यांमुळे धुळीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. या खडतर व खड्डेमय रस्त्यांमुळे विशेषतः वयोवृद्ध नागरिक, महिला आणि लहान मुलांना ये-जा करताना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. तसेच अंधारात हे खड्डे न दिसल्याने रोज लहान-मोठे अपघात घडत आहेत. याशिवाय, समता नगर पुलाजवळ प्रशासनाकडून बसवण्यात आलेल्या दोन हायमास्ट लाईटपैकी एक हायमास्ट पूर्णपणे बंद असून दुसऱ्यावर केवळ दोनच दिवे सुरू आहेत. गल्लीबोळांतील पथदिवेही बंद असल्याने संपूर्ण परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. या परिस्थितीचा फायदा घेत चोऱ्या व असामाजिक तत्त्वांचा उपद्रव वाढला असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या सर्व समस्यांची गांभीर्याने दखल घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विधानसभा प्रमुख नितीन सोळंके यांनी आशी नगर झोनचे सहाय्यक आयुक्त गणेश राठोड यांना निवेदन सादर केले. निवेदनात मागणी करण्यात आली आहे की, विद्युत विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांनी रात्रीच्या वेळी स्वतः फिरून बंद पथदिव्यांची पाहणी करावी आणि दुसऱ्या दिवशी दुरुस्ती पथकाकडून ते दुरुस्त करून घ्यावेत. तसेच खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती करून पक्के रस्ते त्वरित तयार करण्यात यावेत. हे निवेदन विद्युत विभागाचे मुख्य अधिकारी प्रदीप खोब्रागडे यांच्याकडे वर्ग करण्यात आले आहे. आगामी दिवाळीच्या सणापूर्वी बाबादीप नगर व समता नगर परिसरातील बंद पथदिवे सुरू करून विद्युत रोषणाई करावी आणि रस्त्यांची दुर्दशा दूर करावी, अशी ठाम मागणी नितीन सोळके यांनी केली आहे. प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष न दिल्यास नागरिकांसह तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

२८.५१ लाखांची सायबर फसवणूक

लातूर : डिजिटल अरेस्ट्च्या नावाखाली नागरिकांना धमकावून आर्थिक फसवणूक करणाऱ्या सायबर गुन्हेगारांविरुद्ध लातूर पोलिसांनी प्रभावी कारवाई केली आहे. तब्बल २८ लाख ५१ हजार ९९९ रुपयांच्या फसवणूक प्रकरणात ६ आरोपींना अटक करण्यात आली असून, न्यायालयाने आरोपींना ६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईमुळे डिजिटल अरेस्ट्च्या माध्यमातून नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या सायबर गुन्हेगारांना मोठा धक्का बसला आहे. लातूर येथील ६६ वर्षीय निवृत्त कर्मचारी यांना अज्ञात व्यक्तींनी पोलीस अधिकारी, एटीएस आणि ईडी अधिकारी असल्याचे भासवून संपर्क साधला. फियादीं यांचा १२२ कोटी रुपयांच्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात सहभाग असून दहशतवाद्यांशी संबंध असल्याचे खोटे सांगण्यात आले.

अंगणवाड्यांचे हस्तांतरण पूर्ण, प्राथमिक शाळांची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

नगराध्यक्षा श्रीरामे यांची जिल्हा परिषद अधिकाऱ्यांशी भेट



दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

येथील नगर पंचायत हद्दीतील अंगणवाडी आणि प्राथमिक शाळांच्या हस्तांतरण प्रक्रियेला वेग आला आहे. शहरातील अंगणवाड्यांचे हस्तांतरण यापूर्वीच पूर्ण झाले असून, प्राथमिक शाळा नगर पंचायतीकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया पुढील टप्प्यात पोहोचली आहे. या संदर्भात नगराध्यक्षा सुषमा श्रीरामे, महिला व बालकल्याण सभापती रीना खापरीकर आणि नगरसेविका जया नंदनवार यांनी जिल्हा परिषद नागपूर येथील शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तसेच महिला व बालकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी हस्तांतरण प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

अंगणवाड्या आणि प्राथमिक शाळांचे हस्तांतरण पूर्ण झाल्यानंतर शहरातील बालशिक्षण व प्राथमिक शिक्षण व्यवस्थेचे नियोजन, देखरेख आणि विकासाची जबाबदारी नगर पंचायतीला अधिक प्रभावीपणे पार पाडता येणार आहे. त्यामुळे या प्रक्रियेच्या पुढील कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे.

मेंढल्याच्या विकासाला निधीची साथ, आमदार ठाकूर यांचे विशेष लक्ष!

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड



नरखेड तालुक्यातील मेंढला गावाच्या विकासकामांना गेल्या काही वर्षांत मोठी चालना मिळाली असून, गावातील विविध मूलभूत सुविधांसाठी आमदार चरणसिंग ठाकूर यांच्या माध्यमातून ७० लाखांहून अधिक निधी उपलब्ध झाल्याचे सांगण्यात येत आहे. या निधीतून गावात नाल्याचे बांधकाम, सिमेंट रस्ते, पांधण रस्ते, बाजार चौकातील गट्टूचे काम, वृक्षारोपणासाठी झाडांची उपलब्धता यासह विविध विकासकामे करण्यात आली आहेत.

काटोल विधानसभा मतदारसंघाच्या २०१९च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान मेंढला येथील बाजार चौकात झालेल्या सभेत आमदार चरणसिंग ठाकूर यांनी गावकऱ्यांसमोर विविध विकासकामांची आश्वासने दिली होती. आमदार झाल्यानंतर त्यांनी मेंढला गावासाठी निधी उपलब्ध करून देत अनेक कामे मार्गी लावल्याने दिलेल्या शब्दाची पूर्तता करण्याच्या दिशेने प्रयत्न झाल्याचे चित्र आहे.

गावातील नाल्याचे बांधकाम झाल्याने पावसाळ्यातील पाण्याचा निचरा होण्यास मदत होत आहे. सिमेंट रस्ते आणि पांधण रस्त्यांच्या कामामुळे गावातील अंतर्गत दळणवळणासह शेतकऱ्यांची शेताकडे होणारी ये-जा सुलभ झाली आहे. बाजार चौकातील गट्टूचे काम तसेच वृक्षारोपणासाठी झाडांची उपलब्धता यामुळे सार्वजनिक परिसराच्या विकासालाही हातभार लागला आहे.

मेंढला गावातील आणखी काही विकासकामे प्रस्तावित असून, त्यांना मंजुरी व निधी उपलब्ध झाल्यानंतर ही कामेही मार्गी लागण्याची अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. गावाच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन मूलभूत सुविधांचा विस्तार करण्याची आवश्यकता असून, यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करण्याची मागणीही ग्रामस्थांकडून होत आहे.

मेंढला गावाच्या विकासकामांसाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यामध्ये संत सावता माळी संस्था काटोलचे माजी अध्यक्ष तथा माजी शिक्षक पंजाबराव ढंढारे यांचेही मोलाचे योगदान असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात येत आहे. गावातील विविध प्रश्न आणि विकासकामे

२०१९च्या आश्वासनांची पूर्तता, ७० लाखांहून अधिक निधीतून विविध विकासकामे

संबंधित स्तरावर मांडून निधी मिळविण्यासाठी त्यांनी केलेल्या प्रयत्नांची ग्रामस्थांकडून दखल घेतली जात आहे.

दरम्यान, गावासाठी विविध विकासकामांना निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामपंचायत मेंढला तसेच समस्त गावकरी, माता-भगिनी यांनी आमदार चरणसिंग ठाकूर यांचे आभार मानले आहेत. गावाच्या विकासासाठी भविष्यातही अशाच प्रकारे सहकार्य आणि निधी उपलब्ध करून द्यावा, अशी अपेक्षाही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. २०१९च्या विधानसभा निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनांच्या पार्श्वभूमीवर मेंढला गावात झालेली विकासकामे आणि प्रस्तावित कामे यामुळे गावाच्या विकासाला गती मिळत असल्याचे चित्र आहे. आतापर्यंत ७० लाखांहून अधिक निधी उपलब्ध झाल्याने अनेक मूलभूत कामे मार्गी लागली असून, उर्वरित प्रस्तावित कामेही लवकर पूर्ण व्हावीत, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

राज्यात मार्चअखेर कृषिपंपांना शंभर टक्के दिवसा वीजपुरवठा

महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांची माहिती



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात शेतकऱ्यांना कृषिपंपासाठी दिवसा वीजपुरवठा करण्याच्या हेतूने सुरू केलेल्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० च्या बळावर राज्यात आता ८० टक्के कृषिपंपांना दिवसा वीज पुरवठा होत आहे. आगामी मार्च अखेर १०० टक्के कृषिपंपांना सौरऊर्जेद्वारे दिवसा वीजपुरवठा करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आणि महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी मंगळवारी (दि. ३) केले.

नवी दिल्ली येथे भारत रिन्यूबल एनर्जी समिट अँड एक्सपो २०२६ या केंद्र सरकारच्या नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेतील चर्चासत्रात लोकेश चंद्र बोलत होते. 'डिस्ट्रीब्यूटेड एनर्जी फॉर एनर्जी सिक्युरिटी, सेल्फ रिलायन्स अँड विकसित भारत २०४७' या चर्चासत्रात त्यांनी महाराष्ट्राने विकेंद्रीत स्वरूपात सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभे करून कृषी पंपांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी कशी कामगिरी केली आहे, हे स्पष्ट केले. या चर्चासत्रात पंतप्रधानांचे सल्लागार श्री. तरुण कपूर यांचे मुख्य भाषण झाले.

इंटरनॅशनल सोलर अलायन्स असेंब्लीच्या नवव्या सत्रात आयोजित 'पंप्स टू प्रोग्रेस्सः स्केलिंग सोलरायझेशन ऑफ अॅग्रीकल्चर इन द ग्लोबल साउथ' या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात लोकेश चंद्र यांनी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना आणि मागेल त्याला सौर कृषी पंप योजना यांची यशोगाथा आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींसमोर मांडली. सोलर अलायन्सचे महासंचालक आशिष खन्ना यांनी यावेळी लोकेश चंद्र यांच्याशी संवाद साधला.

लोकेश चंद्र यांनी सांगितले की, महाराष्ट्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना ही पीएम कुसुम या केंद्राच्या योजनेच्या आधारे सुरू करण्यात आली असून या योजनेत १६ हजार मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प विकेंद्रीत स्वरूपात उभारण्यात येत आहेत. आतापर्यंत सुमारे ७ हजार मेगावॉटचे प्रकल्प पूर्ण झाले आहेत. त्यातून उपलब्ध होणारी वीज आणि अन्य तांत्रिक उपायांच्या आधारे आता ८० टक्के कृषिपंपांना दिवसा वीजपुरवठा सुरु आहे. शंभर टक्के कृषी पंपांना दिवसा सौरऊर्जेचा पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, ते मार्चअखेर पूर्ण होईल.

त्यांनी सांगितले की, कृषिपंपांना दिवसा व रात्री असा दोन पाळ्यांमध्ये वीज पुरवठा करण्यातून निर्माण होणारी समस्या सर्व देशातील सर्व वीज वितरण कंपन्यासमोर आहे. कृषी पंपांना वीज पुरवठा करण्यासाठी सौर ऊर्जेकडे वळणे हाच आता पुढचा मार्ग आहे. त्यामुळे वीज वितरण कंपन्यासमोर समस्या दूर होतील. कृषी पंपांना दिवसा दर्जेदार वीज पुरवठा उपलब्ध होईल. त्याचबरोबर राज्य सरकारचा अनुदानाचा खर्च कमी होईल.

नवीन गुंतवणूक व वाढती जीवनशैली यामुळे महाराष्ट्रात विजेची मागणी झपाट्याने वाढत आहे. आगामी काळातील मागणी पूर्ण करण्यासाठी राज्याने आराखडा तयार केला आहे. नवीकरणीय उर्जेवर भर देऊन विजेची गरज पूर्ण करण्यात येईल, अशी माहिती लोकेश चंद्र यांनी दिली.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठी केलेले नियोजन आणि तांत्रिक उपाय योजना याची लोकेश चंद्र यांनी आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींना माहिती दिली. त्यासोबतच त्यांनी सांगितले की, सौर कृषी पंप लावण्यात राज्याने आघाडी घेतली असून देशातील एकूण सौर कृषी पंपांपैकी ६५ टक्के सौर कृषिपंप राज्यात बसवण्यात आले आहेत. सौर ऊर्जेमुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी हक्काचे साधन मिळत आहे. त्यांना हवे तेव्हा सिंचन करता येत असल्यामुळे पाण्याचा अपव्यय टाळला जात आहे. सोबत शेतीची उत्पादकताही वाढत असल्याचा अनुभव येत असल्याचे त्यांनी सांगितले.

शासकीय नोकऱ्यांमधील अचूक अनुशेष शोधणार !

ओबीसी उपसमितीचे अध्यक्ष, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही, विद्यार्थ्यांना पुढील वर्षात मिळणार स्वतंत्र वसतिगृह, महात्मा फुले यांच्या द्विशताब्दीनिमित्त विविध २१ उपक्रम

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

शासकीय नोकऱ्यांमधील ओबीसींच्या अनुशेषाचा मुद्दा ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत कळीचा ठरला असून, मंत्री छगन भुजबळ आणि गणेश नाईक यांनी मागणी केल्यानुसार या अनुशेषाची सविस्तर व अचूक माहिती घेण्याचे निर्देश आज झालेल्या बैठकीत उपसमितीचे अध्यक्ष व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

बावनकुळे म्हणाले की, अर्थ व सांख्यिकी विभागाने दिलेल्या अहवालानुसार मंजूर ७ लाख ३५ हजार ५७३ पदांपैकी ५ लाख १० हजार ८२४ पदे भरली असून २ लाख २४ हजार ७४९ जागा रिक्त आहेत. मात्र,छगन भुजबळ आणि गणेश नाईक यांनी मागणी केल्यानुसार या अनुशेषाची सविस्तर व अचूक माहिती घेण्यात येईल.

ओबीसी, भटक्या-विमुक्त आणि बहुजन समाजाच्या उत्कर्षासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून समाजाचे सर्व प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लावले जातील. विविध महामंडळांच्या नियुक्त्या, त्यांना बजेट देणे व विविध प्रश्न तातडीने निकाली काढून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार ओबीसी समाजाच्या सर्व अपेक्षा पूर्ण करेल, असा विश्वास व्यक्त केला.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीला अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक,



इतर मागास व बहुजन कल्याणमंत्री अतुल सावे आणि जल व मृदसंधारणमंत्री संजय राठोड आणि मंत्रालयातील ओबीसीसह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

बावनकुळे म्हणाले की, राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ओबीसी मुला-मुलींसाठी जिल्हास्तरीय वसतिगृहे आणि 'महाज्योती'च्या कार्यालयांसाठी महसूल विभागातफे १ रुपया नाममात्र दराने जागा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. यापैकी २२ जिल्ह्यांत जागा मिळाल्या असून, उर्वरित १४ जिल्ह्यांतील जागा महिनाभरात उपलब्ध करून दिल्या जातील. वसतिगृहांच्या उत्कृष्ट डिझाइन व नियोजनासाठी महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाला सहा आर्किटेक्ट नियुक्त करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच पुण्यातील प्रस्तावित एकत्रित संकुल आणि मुंबईतील गोरेगाव-आरे येथील दुग्ध विकास विभागाच्या 'न्यूझीलंड वसतिगृहा'तील ८० खोल्यांचा ताबा ओबीसी वसतिगृहासाठी घेण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे, ज्यामुळे तेथे १५० विद्यार्थ्यांची सोय होईल.

याशिवाय, सीबीएसई व आयसीएसई अभ्यासक्रम असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या माहितीचा समावेश करण्याबाबतही शिक्षण विभागाला सूचना देण्यात आल्या आहेत.

क्रांतिज्योती महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त २१ योजना विविध सरकारी विभागांच्या माध्यमातून विशेष उपक्रम राबवले जातील. तसेच, विविध दुष्काळी उपाययोजनांना महात्मा ज्योतिबा फुले यांचे नाव देण्याचा निर्णयही घेण्यात आला आहे.

लक्ष्मण हाके यांनी उपस्थित केलेल्या 'कॅम्प व्यतिरिक्त जागांबाबत' महसूलमंत्र्यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची भेट घेऊन हा मुद्दा मार्गी लावण्याबाबत स्पष्ट भूमिका घेतली. तसेच १८ पगड जाती व व्हीजेएनटीच्या ४३ समाजांकडून येणाऱ्या निवेदनांवर उपसमिती दर आठवड्याला निर्णय घेत असल्याचेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

थोडक्यात

३४ वर्षाच्या सेवेसाठी सुनंदा पोतदार यांचा सत्कार

दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड

नरखेड नगर परिषद शिक्षण विभागात तब्बल ३४ वर्षे अविरत, निष्ठेने आणि समर्पित भावनेने शैक्षणिक सेवा देणाऱ्या नगर परिषद



शाळा क्रमांक ५ च्या मुख्याध्यापिका सुनंदा पोतदार यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी नगर परिषद नरखेडचे शिक्षण सभापती राजेंद्र बालपांडे होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून सुनंदाताई पोतदार यांच्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेचा गौरव केला. विद्यार्थ्यांप्रती असलेली त्यांची आत्मीयता, कामाप्रती असलेली निष्ठा, सहकाऱ्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि मुख्याध्यापक म्हणून पार पाडलेली जबाबदारी यांचा विशेष उल्लेख करून सत्कार करण्यात आला.

या सेवापूर्ती सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण समिती सदस्य सुधाकर काळे व प्रकाश बालपांडे उपस्थित होते. यावेळी नगरसेवक नितीन ढोमणे, हर्षलता रेवतकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष हरीश भोदे, प्रमोद बेले, प्रशासन अधिकारी दिनकर लेंभाडे,केंद्रप्रमुख रविंद्र पडवे, अनिल कावळे, प्रभाकर लाडे, धनराज रेवतकर, नीता वंजारकर आदी मान्यवर उपस्थित होते. यासह आबेदा बेग, प्रकाश इंजेवार, चंदा लोखंडे, वैशाली महंत, मीनाक्षी सरोदे, प्रकाश अढाऊ,सुनील मोहोड, प्राचार्य राजेश महंत, गोविंद पोतदार, समीर पोतदार, रवीना पोतदार,आगरकर, उईके, वाघमारे तसेच गौरी वाघ तसेच नगर परिषद शिक्षण विभागातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व नगर परिषदेचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संविधान दिनानिमित्त राज्यस्तरीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा

भारतीय संविधान दिनाच्या ७७ व्या वर्षानिमित्त ध्येयनिष्ठ अधिकारी ग्रुप, महाराष्ट्र यांच्यावतीने राज्यस्तरीय ऑनलाइन प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसह स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या उमेदवारांमध्ये संविधानाविषयी जागरूकता निर्माण करणे, राज्यशास्त्राचे ज्ञान वाढविणे तसेच चालू घडामोडींचा अभ्यास करण्यास प्रोत्साहन देणे हा या स्पर्धेचा उद्देश आहे. या स्पर्धेमध्ये भारतीय राज्यघटना, राज्यशास्त्र आणि चालू घडामोडी या विषयांवर आधारित बहुपर्यायी प्रश्न विचारले जाणार आहेत. प्रश्नपत्रिकेत एकूण ६० प्रश्न असून प्रत्येक प्रश्नाला दोन गुण असतील. परीक्षा २४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२ ते १२.३० या वेळेत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहे. स्पर्धेचा निकाल २६ नोव्हेंबर २०२६ रोजी जाहीर करण्यात येईल. सहभागी सर्व स्पर्धकांना ऑनलाइन प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास २,००१ रुपये, द्वितीय क्रमांकास १,५०१ रुपये आणि तृतीय क्रमांकास १,००१ रुपये रोख पारितोषिकासह 'शोध सुखाचा' हे पुस्तक देण्यात येणार आहे. तसेच सहा उत्तेजनार्थ विजेत्यांना प्रत्येकी २०१ रुपये देण्यात येतील. स्पर्धेची प्रवेश फी ५१ रुपये असून नोंदणीची अंतिम तारीख २२ नोव्हेंबर २०२६ आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी परवेश मेश्राम (७६२०९९२४६२), दिलीप येवले (९८९०५६१२४१), अनिल भगवान चव्हाण (८८०६३७९९५९) किंवा दिनेश मंडपे (८९९९५५८७४५) यांच्याशी व्हॉट्सअप संदेशाद्वारे संपर्क साधावा. ऑनलाइन शुल्क भरल्यानंतर त्याचा स्क्रीनशॉट पाठवून नोंदणी पूर्ण करावी. अधिक माहितीसाठी केवळ व्हॉट्सअप संदेशाद्वारे संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

गांगनेर हलक्या अंतर्गत आज भूसंपादन करण्यासाठी ५० शेतकऱ्यांची शेतीची मोजणी

ग्रामपंचायत कार्यालयात शेतकऱ्यांना बोलावून तलाठी शेंडे यांनी शेतकऱ्यांना दिल्या नोटीस



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

नागपूर शहराच्या विस्तार वाढविण्यासाठी एनएमआरडीएच्या तृतीय बाहय रिंग रस्त्यासाठी होणाऱ्या भूसंपादनाच्या मोजणीसाठी मौदा तालुक्यातील गांगणेर हलक्या अंतर्गत येणाऱ्या गांगणेर येथील २६ तर सालवा येथील २४ अशा एकूण ५० शेतकऱ्यांची शेतीची मोजणी उद्या गुरुवार (ता.५ नोव्हेंबर)ला होणार आहे. यासाठी मंगळवार (ता. ३ नोव्हेंबर)ला ग्रामपंचायत कार्यालय गांगणेर येथे गांगनेर येथील तलाठी आकाश शेंडे हे संबंधित शेतकऱ्यांना भ्रमणध्वनीवरून मोजणी संबंधी पत्र देण्यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात बोलावीत होते व त्यांना नोटीस देत होते. या कामासाठी त्यांना चाचेर हलक्याचे तलाठी अविनाश मते हेही मदत करीत होते.

आयर्नमॅन ७०.३ गोवा स्पर्धेत डॉ. अर्जुन मंदाडे यांची दमदार कामगिरी

लातूर : गोवा राज्याची राजधानी पणजी येथील मिरामार बीचवर पार पडलेल्या प्रतिष्ठित आयर्नमॅन ७०.३ गोवा २०२६ या आंतरराष्ट्रीय ट्रायथलॉन स्पर्धेत लातूरचे सुप्रसिद्ध कर्करोगतज्ज्ञ डॉ. अर्जुन मंदाडे यांनी उल्लेखनीय कामगिरी करत स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली. आपल्या पहिल्याच आयर्नमॅन ७०.३ स्पर्धेत त्यांनी अवघ्या ६ तास ५८ मिनिटांत तिन्ही आव्हानात्मक टप्पे पूर्ण करत जिद्द, चिकाटी, मानसिक कणखरता आणि उत्कृष्ट शारीरिक तंदुरुस्तीचा प्रत्यय दिला. या स्पर्धेमध्ये १.९ किलोमीटर पोहणे, ९० किलोमीटर सायकलिंग आणि २१.१ किलोमीटर धावणे अशा तीन अत्यंत कठीण टप्प्यांचा समावेश होता. एकूण ११३ किलोमीटरचे अंतर पार करावे लागणारी ही स्पर्धा शारीरिक क्षमतेबरोबरच मानसिक ताकद, सातत्यपूर्ण सराव, संयम आणि योग्य नियोजनाची कसोटी पाहणारी मानली जाते. हे तिन्ही टप्पे डॉ. मंदाडे यांनी यशस्वीरीत्या पूर्ण करून आयर्नमॅन ७०.३ फिनिशर होण्याचा बहुमान मिळवला.

अवघ्या २४ तासांत दोन बिबट्यांना जेरबंद करण्यात वनपरिक्षेत्र पारशिवनीची यशस्वी कामगिरी

दै. सिंहवाणी वृत्त, पारशिवनी

वनविभाग नागपूर प्रादेशिक वनपरिक्षेत्र पारशिवनी वन्यजीव संरक्षण आणि मानव-वन्यजीव संघर्षाचे प्रभावी व्यवस्थापन करण्याच्या दृष्टीने वनपरिक्षेत्र पारशिवणी अंतर्गत वनविभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अवघ्या २४ तासांत २ नर बिबट्यांना यशस्वीरीत्या जेरबंद करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कार्यवाहीमुळे परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती कमी करण्यास मदत होणार असून, वन्यजीव संरक्षणाच्या दृष्टीने वनविभागाने तत्परता दाखविली आहे.

वनपरिक्षेत्र पारशिवनी अंतर्गत सहवनक्षेत्र पारशिवनी, बीट भागेमहरी, मौजा हिंगणा येथून एका बिबट्याला यशस्वीरीत्या जेरबंद करण्यात आले. त्यानंतर संबंधित बिबट्यावर आवश्यक प्रथमोपचार करण्यात आले आणि त्याला नियमानुसार नैसर्गिक अधिवासात मुक्त करण्यात आले. मागील २४ तासांत २ बिबट्यांना जेरबंद करण्याची ही कार्यवाही वनविभागाच्या नियोजनबद्ध प्रयत्नांचे, अधिकारी व कर्मचाऱ्यांमधील समन्वयाचे



आणि वन्यजीव संरक्षणप्रती असलेल्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन

सदर कार्यवाही डॉ.विनिता व्यास, उपवनसंरक्षक, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच गोविंदा लूचे, सहाय्यक वनसंरक्षक, रामटेक यांच्या समन्वयाने पार पडली.

या मोहिमेत राहुल शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी, पारशिवनी आणि जिवनप्रकाश मेंढे, उपवनक्षेत्र अधिकारी, पारशिवणी यांनी नियोजन व अंमलबजावणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

मोहिमेत सहभागी अधिकारी व कर्मचारी

वनरक्षक : प्रकाश कालेकर, अक्षय जाधव, शिवशंकर पिल्लेवान, सूरज बेले, दीपाली नान्हे, शुभांगी कुरंजेकर, संदीप धुर्वे, अमोल गडगिडे, राजेश सानूले, मेघा धानोडे, अमित मेश्राम, पंकज शेंद्रे व सागर कोहळे, तसेच व्यंकट कुंभरे, संदीप खरखाडे, नंदकिशोर दुनेदार, आकाश, मिलिंद, मिथुन काळसर्पे वनमजूर व आर.आर.टी. चमू, पारशिवणी यांनी या मोहिमेत सक्रिय सहभाग घेऊन महत्त्वपूर्ण सहकार्य केले.

वनविभागाचे आवाहन

वन्यजीवांचे संरक्षण आणि मानव-वन्यजीव संघर्षाचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी वनविभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. नागरिकांनी परिसरात बिबट्या किंवा इतर वन्यप्राण्यांच्या हालचाली आढळल्यास स्वतःहून त्यांचा पाठलाग करू नये, त्यांना पकडण्याचा प्रयत्न करू नये किंवा गर्दी करू नये. अशा घटनांची माहिती तात्काळ वनविभागाला द्यावी, असे आवाहन वनविभागामार्फत करण्यात येत आहे.

दुष्काळाने धान उत्पादक शेतकरी अडचणीत; पंचनामे पूर्ण, पाच हजार रुपयांची अग्रिम मदत वाटप सुरू : जिल्हाधिकारी मंदार पत्की

जिल्ह्यातील एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांची माहिती संकलित; खचून न जाता पुढील हंगामाच्या तयारीला लागण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

दै. सिंहवाणी वृत्त, गोंदिया

यंदाच्या खरीप हंगामात दुष्काळी परिस्थितीमुळे गोंदिया जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला आहे. काही भागांत कीड व रोगांच्या प्रादुर्भावामुळे, तर काही भागांत पाण्याच्या अभावामुळे पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना या संकटातून दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार जिल्ह्यात पीक नुकसानीचे पंचनामे पूर्ण करण्यात आले असून, एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात आली आहे. या शेतकऱ्यांना पाच हजार रुपयांची अग्रिम आर्थिक मदत देण्याची प्रक्रिया सुरू झाली असल्याची माहिती जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी दिली.



जिल्हाधिकारी पत्की म्हणाले की, यंदा प्रतिकूल हवामान आणि दुष्काळी परिस्थितीचा धान उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. पिकांचे नुकसान लक्षात घेऊन शासनाने पंचनाम्यांची प्रक्रिया पूर्ण करून एक लाखांहून अधिक शेतकऱ्यांची माहिती संकलित केली आहे. शेतकऱ्यांना तातडीचा आर्थिक दिलासा मिळावा, यासाठी पाच हजार रुपयांची अग्रिम मदत त्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये; प्रशासन मदतीसाठी तत्पर

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आवाहन करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, नैसर्गिक संकटामुळे नुकसान झाले असले तरी शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये. उपलब्ध संसाधने आणि हातासी असलेल्या उत्पन्नाचा योग्य वापर करून पुढील पीक घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू ठेवावेत. शेतीसंदर्भात किंवा अन्य कोणत्याही शासकीय मदतीसाठी अडचण असल्यास जिल्हा प्रशासन किंवा संबंधित तालुका प्रशासनाशी संपर्क साधावा. शेतकऱ्यांना आवश्यक मदत व सहकार्य करण्यासाठी प्रशासन तत्पर आहे.

दोन दिवसीय मशरूम लागवड प्रशिक्षणाचे आयोजन संपन्न

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), भंडारा आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), भंडारा तालुका कृषी अधिकारी कार्यालय, तुमसर यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, तुमसर

शक्ती लोकसंचालित साधन केंद्र, तुमसर येथील महिला बचत गटांच्या ८६ महिलांसाठी दिनांक ३० व ३१ ऑक्टोबर २०२६ रोजी दोन दिवसीय मशरूम लागवड प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमाला माविम भंडाराच्या उप व्यवस्थापक संगीता भोंगाडे मॅडम, तालुका कृषी अधिकारी दुर्गेश्वरी एकतापुरे मॅडम, मंडळ कृषी अधिकारी सिहोरा तलमले सर, उटफ व्यवस्थापक मंदा साकुरे, वंदना आगाशे CMRC अध्यक्ष,उपजीविका विकास सल्लागार दिपक पालेवार,



आत्माचे BTM चंद्रशेखर खंडाईत, पायलेट मशरूमचे संचालक इखार सर तसेच महिला बचत गटांच्या सदस्यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन BTM चंद्रशेखर खंडाईत यांनी केले, तर कार्यक्रमाची प्रस्तावना उटफ व्यवस्थापक मंदा साकुरे यांनी केली. मशरूम लागवडीचे तांत्रिक प्रशिक्षण पायलेट मशरूमचे संचालक इखार सर यांनी दिले. यावेळी मशरूम लागवडीचे तंत्रज्ञान, उत्पादन प्रक्रिया, व्यवस्थापन आणि त्यातून मिळणाऱ्या आर्थिक उत्पन्नाची संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी रहांगडाले मॅडम कृषी पर्यवेक्षक व मेश्राम मॅडम अधिक्षक यांनी उपस्थित राहून महिलांना मार्गदर्शन केले.



तसेच बनसोड मॅडम यांनी मशरूम लागवडीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक प्रशिक्षण दिले. त्यामुळे महिलांना प्रत्यक्ष मशरूम उत्पादन प्रक्रिया समजून घेण्याची संधी मिळाली.

या प्रशिक्षणामुळे महिला बचत गटांना मशरूम लागवड, उत्पादन, प्रक्रिया व विक्रीच्या माध्यमातून उत्पन्नाचे नवीन साधन उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. महिलांनी केवळ प्रशिक्षणापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उत्पादन व उद्योग उभारणीसाठी पुढाकार घ्यावा, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. या कार्यक्रमात संयोगिनी, भीमा बनसोड, अनुसया देशमुख, रेखा उमाळे, लक्ष्मी तिडके, संगीता डोंगरे आणि CRP यांनी पण सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या शेवटी दीपक पालेवार यांनी उपस्थित मान्यवर, प्रशिक्षक व महिला बचत गटांच्या सदस्यांचे आभार मानले.

शासकीय योजना व अनुदानाबाबत मार्गदर्शन

मंडळ कृषी अधिकारी ए. जी. तलमले यांनी मशरूम उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजना, अनुदान व वित्तीय सहाय्य याविषयी माहिती दिली. उपजीविका विकास सल्लागार दीपक पालेवार यांनी मशरूमपासून विविध टिकाऊ खाद्यपदार्थ तयार करणे, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग उभारणी तसेच प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या माध्यमातून महिलांना स्वयंरोजगार व उद्योग उभारणीसाठी उपलब्ध असलेल्या संधींबाबत मार्गदर्शन केले.

थोडक्यात

रिअल इस्टेटचे व्यवहार सांभाळून करा : ॲड. संदीप शास्त्री

विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनमध्ये विशेष सत्राचे आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मालमत्तेच्या मालकाची तोतयागिरी करणे, ७/१२ उतारे आणि प्रॉपर्टी कार्डमध्ये बनावटगिरी किंवा फेरफार करणे तसेच अनधिकृत लेआउट आणि कृषी जमिनीवर पाडलेले फार्महाऊस प्लॉट विकण्याचे प्रकार वाढत आहेत. रिअल इस्टेटचे व्यवहार जोखमीचे झाले असून कोणत्याही मालमत्तेत गुंतवणूक करण्यापूर्वी खरेदीदारांनी सखोल कायदेशीर पडताळणी करणे आवश्यक असल्याचे मत मध्य भारतातील प्रख्यात रिअल इस्टेट कायदेविषयक सल्लागार ॲड. संदीप शास्त्री यांनी व्यक्त केले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशन (व्हीएमए)च्या वतीने अलीकडेच आयोजित रिॲलिटी चेक फॉर रिअल इस्टेट या सत्रात ते बोलत होते. प्रसाद फसाटे यांनी सत्राचे संचालन केले.

मालमत्ता खरेदी करताना पाच महत्त्वाच्या बाबी तपासण्याचा सल्ला त्यांनी दिला. यामध्ये मालकी हक्क, जमिनीचा वापर, आर्थिक व्यवहार, विक्रेत्याची विश्वासार्हता आणि मालमत्तेची प्रत्यक्ष स्थिती यांचा समावेश आहे. नोंदणीकृत दस्तऐवजांची संपूर्ण साखळी, जमीन अभिलेख, झोनिंगविषयक परवानग्या आणि वैधानिक मंजुरींची सखोल तपासणी करणे आवश्यक आहे. विक्रेत्याची ओळख आणि मालमत्ता विकण्याचा त्याचा कायदेशीर अधिकार तपासण्याबरोबरच मालमत्तेचे प्रत्यक्ष क्षेत्रफळ, हद्दी आणि ताब्याची स्थितीही पडताळून पाहावी, असे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी, महेंद्र गिरिधर यांनी मंथन ओटीपी सत्रात विक्री क्षेत्राचे मॅपिंग, त्यामागील उद्देश आणि त्याची प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन केले.

खापरखेडा औष्णिक वीज केंद्रात पत्रकारांची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न!



दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

खापरखेडा औष्णिक वीज केंद्रातील सौदामिनी कार्यालयात मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पत्रकार बांधवांची बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत परिसरातील विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर व समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली पत्रकारांच्या शिष्टमंडळाने मांडलेल्या सर्व मुद्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन ते लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांनी याप्रसंगी दिले. यावेळी पत्रकार बांधवांच्या वतीने मुख्य अभियंता डॉ. भूषण शिंदे यांचा पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

बैठकीला उपमुख्य अभियंता श्री. नितीन रोकडे, कल्याण अधिकारी आनंद वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच वरिष्ठ पत्रकार दिवाकर घेर, अमर जैन, ओमप्रकाश साद, मनोज डेव्हिड, सुनील जालंदर, कपिल वानखेडे, दिलीप गजभिये, राजेश खंडारे, सुधीर फेंडर, अभय मिश्रा, मयूर तिरपुडे, विनोद गोडबोले, केशव पानतावणे, विक्की थापा, श्रीराम सातपुते आदी पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समर्पण फाउंडेशनच्या रजत जयंतीचा ७ नोव्हेंबरला सोहळा

२५ वर्षांपासून गरजू रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांची निःस्वार्थ सेवा; सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांची प्रमुख उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

रुग्ण सेवा हीच नारायण सेवा हा विचार प्रत्यक्षात आणत समर्पण फाउंडेशन, नागपूर गेल्या २५ वर्षांपासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात येणाऱ्या गरजू रुग्णांच्या नातेवाइकांना निःशुल्क भोजन व निवासासह विविध सेवा पुरवत आहे. वर्ष २००१ मध्ये अवघ्या १०० लोकांच्या भोजन व्यवस्थेपासून सुरू झालेला हा सेवायज्ञ आज व्यापक स्वरूपात विस्तारला आहे. संस्थापक हनुमान प्रसाद राठी यांच्या पुढाकारातून सुरू झालेल्या या सेवाकार्याते आज समर्पण भवनाच्या माध्यमातून गरजूंसाठी भोजन, निवास, फळे, कपडे, चप्पल, औषधे तसेच गरजेनुसार रक्त उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य केले जाते. मेडिकल चौकातील राजाबाक्षा हनुमान मंदिराजवळील सुमारे ११ हजार चौरस फुटांच्या तीन मजली समर्पण भवनातून हा उपक्रम राबविला जातो. कोरोना काळातही संस्थेने आपली सेवा अखंडित सुरू ठेवली.

या सेवाकार्याला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त शनिवार, ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५.३० ते ७.३० या वेळेत समर्पण भवन, मेडिकल चौक येथे रजत जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक परमपूजनीय डॉ. मोहन भागवत प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. नागपुरातील विविध क्षेत्रांतील सुमारे ५०० मान्यवरांनाही निमंत्रित करण्यात आले आहे. पत्रकार परिषदेत संस्थापक हनुमान प्रसाद राठी, जयप्रकाश राठी, नारायण राठी, गोविंद राठी, प्रेमप्रकाश दुबे, आनंद जोशी, चंद्रशेखर गलगलिकर आणि यतींद्र नाडकर्णी यांनी संस्थेच्या २५ वर्षांच्या सेवाकार्याची माहिती दिली. उपचारासाठी येणाऱ्या कोणत्याही गरजू रुग्णाच्या नातेवाइकाला भोजन व निवासाची चिंता भासू नये, हा संस्थेचा सेवाभावी संकल्प आहे.

योग्य वाढीव मोबदला दिल्यास जमीन देण्यास तयार!

डिफेन्स कॉरिडॉर प्रकल्पातून हजारो रोजगारांच्या संधी निर्माण होणार; शेतकऱ्यांच्या हक्कासाठी शासनदरबारी पाठपुरावा करण्याची आमदारांची ग्वाही

नऊ गावांतील शेतकऱ्यांची आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांना ग्वाही

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर तालुक्यातील माळेगाव, जोगा, खुर्सापार, जैतपूर, छत्रापूर, सालई, नांदामोमुख, सावळी मोहतकर आणि जटामखोरा या नऊ गावांमध्ये प्रस्तावित डिफेन्स कॉरिडॉर प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर जमीन संपादन प्रक्रियेला गती मिळत आहे. या प्रकल्पाबाबत शेतकऱ्यांच्या मनातील शंका, गैरसमज दूर करून त्यांना संपूर्ण माहिती मिळावी, या उद्देशाने आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी नऊही गावांतील शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला.



यावेळी शेतकऱ्यांना जमिनीच्या मोबदल्यासंदर्भातील संभाव्य दरांची माहिती देण्यात आली. त्यानुसार कोरडवाहू जमिनीसाठी एकरी ३० ते ३२ लाख रुपये, हंगामी बागायती जमिनीसाठी एकरी ४५ ते ४७ लाख रुपये, तर बागायती जमिनीसाठी एकरी ६४ ते ६५ लाख रुपये मोबदला मिळण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले. याशिवाय शेतजमिनीवरील झाडे, विहिरी, मोटारपंप तसेच इतर मालमत्तेचे स्वतंत्र मूल्यांकन करून त्याचा मोबदला देण्याची प्रक्रिया असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

जमिनीचे संयुक्त मोजमाप (जे.एम.आर.) पूर्ण होणे हा पुढील प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी मोजमाप प्रक्रियेला सहकार्य करावे, असे आवाहन आमदार डॉ. देशमुख यांनी केले. मोजमापानंतर जमिनीवरील मालमत्तेचे मूल्यांकन होऊन त्यानुसार स्वतंत्र मोबदला निश्चित होण्यास मदत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी आमदार डॉ. आशिषराव देशमुख म्हणाले, "शेतकऱ्यांच्या जमिनीला योग्य आणि समाधानकारक मोबदला मिळालाच पाहिजे, ही माझी ठाम भूमिका आहे. शासनाकडून मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा वाढीव मोबदला मिळवून देण्यासाठी मी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. गरज पडल्यास शेतकऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी त्यांच्या खांद्याला खांदा लावून आंदोलनातही सहभागी होईन. शेतकऱ्यांचे नुकसान होऊ देणार नाही."

ते पुढे म्हणाले की, गेल्या अनेक वर्षांपासून या भागात मोठे औद्योगिक प्रकल्प यावेत, रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, अशी जनतेची अपेक्षा होती. आज डिफेन्स कॉरिडॉरसारखा महत्त्वाकांक्षी प्रकल्प या भागात येत आहे. या प्रकल्पामुळे हजारो स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. यासोबतच खतनिर्मिती प्रकल्पासारखे उद्योगही या परिसरात येत असल्याने संपूर्ण क्षेत्राच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे.

स्थानिक तरुणांना केवळ रोजगाराचे आश्वासन न देता त्यांना रोजगारासाठी सक्षम बनविणेही आवश्यक आहे. यासाठी परिसरात कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. या केंद्राच्या माध्यमातून तरुणांना आवश्यक प्रशिक्षण देऊन आगामी उद्योगांमध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्याचा आपला प्रयत्न असल्याचे आमदारांनी सांगितले.

यावेळी आदिवासी बांधवांनीही आपल्या विविध समस्या आणि मागण्या मांडल्या. शेतकऱ्यांनी योग्य व वाढीव मोबदला, सर्वांना समान न्याय, मोबदला प्रक्रियेत पारदर्शकता, स्थानिक तरुणांना रोजगारात प्राधान्य तसेच इतर मूलभूत सुविधांबाबत आपल्या सूचना मांडल्या. सर्व मोबदला एकाचवेळी मिळावा असे शेतकऱ्यांचे म्हणे होते त्यावर सांगण्यात आले की सर्व मोबदला एकाचवेळी मिळणार.

"योग्य आणि वाढीव मोबदला मिळाल्यास आम्ही आमच्या जमिनी देण्यास शंभर टक्के तयार आहोत," अशी स्पष्ट भूमिका नऊही गावांतील अनेक शेतकऱ्यांनी आमदार डॉ. देशमुख यांच्यासमोर मांडली.

शेतकऱ्यांच्या या सकारात्मक भूमिकेचे आमदारांनी मनापासून स्वागत केले. हा प्रकल्प केवळ नऊ गावांपुरता मर्यादित नसून सावनेर-कळमेश्वरसह संपूर्ण परिसराच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरणार आहे. शेतकऱ्यांचे हित, स्थानिक तरुणांचे भविष्य आणि परिसराचा औद्योगिक विकास या तिन्ही बाबींचा समतोल राखूनच प्रकल्प पुढे नेण्याचा आपला प्रयत्न राहील, असे आमदार डॉ. आशिषराव देशमुख यांनी स्पष्ट केले.

या संवादामुळे शेतकऱ्यांच्या मनातील अनेक शंका दूर होण्यास मदत झाली असून, योग्य मोबदला आणि स्थानिकांना रोजगाराची हमी या प्रमुख मागण्यांसह प्रकल्पाबाबत सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे चित्र दिसून आले.

तसेच सगळ्यांनी लोकहितकारी प्रकलपाचे स्वागत केले. व आमदार डॉ आशिषराव देशमुख यांच्या कायार्चे कौतुक केले. यावेळी नऊही गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आमदार राजीव पोतदार, जिल्हाध्यक्ष मनोहर कुंभारे, उपविभागीय अधिकारी कल्याणकुमार डहाट, दिगंबर सुरतकर आदी उपस्थित होते.

नगरपरिषद सावनेर येथे उत्साहात संपन्न दीपावली स्नेह मेळावा!

दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

सावनेर : महाराष्ट्र राज्य संवर्ग कर्मचारी व संवर्ग अधिकारी संघटनेच्या वतीने दिनांक ४ नोव्हेंबर २०२६ रोजी नगरपरिषद सावनेर कार्यालयात अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता एका उत्साही वातावरणात दीपावली स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सावनेर नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दीपावलीचा आनंद व परस्पर सलोखा द्विगुणित केला.



या स्नेह मेळाव्याच्या कार्यक्रमास नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा संजनाताई मंदारजी मंगळे, उपाध्यक्ष राजूभाऊ घुगल आणि मुख्याधिकारी अर्शिया जुही हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. पाहुण्यांचे स्वागत व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कर्मचाऱ्यांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा देत प्रशासकीय सेवेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र राज्य कर्मचारी संघटनेच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी संघटनेचे कार्यकारिणी सरचिटणीस प्रशांत राहांगडाले आणि नागपूर विभागीय अध्यक्ष धीरज देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते.

तसेच कार्यालयातील कार्यालयीन अधीक्षक देवेन कले यांच्यासह देवेंद्र निकोसे, अश्विन चव्हाण, अमोल पाटील, निलेश भोयर, निखिलेश वाडेकर, कीर्ती पुलगमवार, अभिजीत कांबळे, प्रज्वल अवचट, भागेश सिंदिकर, रोशन धोटे, राजेश जांभुळकर, पंकज छेनिया, योगेश वानखेडे, अभय पगारे, कुणाल मुळे, विनय वाघमारे, आकाश नाईक, अर्जुन मतेल, शुभम मोरे, अक्षय नकाशे, राही बागडे , नरेश वाघमारे, अंजली कोहळे,सारिका नालोडे, ऐश्वर्या कश्यप, सूरज मेश्राम, निखिल , प्रशांत बोबडे,मधुकर लोही, कृनाल बांबल, नरेश तुर्केल, नीलिमा लीडर आणि त्रिवेणी वाघमारे आदी अधिकारी व कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक नगरपरिषदेचे लेखापरीक्षक संदेश खंडागळे यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. स्नेह मेळाव्याच्या निमित्ताने कर्मचाऱ्यांनी एकमेकांना फराळाची गोडी चाखवत दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या, ज्यामुळे संपूर्ण कार्यालयात एक आनंदाचे व आपुलकीचे वातावरण निर्माण झाले होते.

मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा

मुंबई : सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही केल्याची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून माननीय सर्वोच्च न्यायालयास देण्यात आली. त्यानुसार, माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशातील परिच्छेद क्रमांक १ ते ३ मागे घेतले आहेत. या निर्णयानुसार, महानगरपालिका आयुक्त आश्विनी भिडे यांच्याविरुद्ध बजावण्यात आलेली कारणे दाखवा नोटीस तसेच महानगरपालिका आयुक्त आणि त्यांच्या वैयक्तिक कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन अदा करण्यावर घालण्यात आलेले निर्बंध मागे घेण्यात आले आहेत.

सर्वोच्च न्यायालयात आज झालेल्या सुनावणीदरम्यान, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ अधिवक्ता आर. पी. भट यांनी न्यायालयाला माहिती दिली की, माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ आणि दिनांक २८ जुलै २०२६ रोजी दिलेल्या आदेशांचे पालन करण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्यात आली आहेत. त्यामुळे, माननीय न्यायालयाच्या अवमानाची स्थिती दूर झाल्याचे त्यांनी नमूद करून दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ चा आदेश मागे घेण्याची विनंती केली. दरम्यान, महानगरपालिका आयुक्त यांनी आदेशांचे पालन करण्यासाठी उचललेल्या पावलांचा तपशील नमूद करणारे वैयक्तिक प्रतिज्ञापत्र पुढील सुनावणीपूर्वी सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. तसेच, दिनांक ३ नोव्हेंबर २०२६ च्या आदेशातील परिच्छेद क्रमांक ५ व ६ कायम ठेवण्यात आले आहे.मुंबई महापालिका आयुक्तांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे. न्यायालयाच्या पूर्वीच्या आदेशांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ३ नोव्हेंबर रोजी आयुक्तांविरोधात अवमानाची नोंद करत कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती.

मानवी मन, भक्तीचे तत्त्वज्ञान अन् कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेध

काळ भूत, दृष्टांत, ओमेगा आणि अश्विनी कार्तिकमधून समकालीन विषयांचे प्रभावी सादरीकरण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

विदर्भ साहित्य संघ, नागपूरच्या वतीने आयोजित नाट्यतपस्वी राम जाधव स्मृती करंडक विदर्भस्तरीय खुल्या एकांकिका स्पर्धेच्या चौथ्या दिवशी चार एकांकिकांचे सादरीकरण करण्यात आले. मानवी भावविश्व, श्रद्धा आणि भक्ती, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच सोशल मीडियाचा प्रभाव अशा विविध विषयांवर आधारित एकांकिकांतून सामाजिक प्रश्न, मानवी संवेदना आणि समकालीन वास्तवाचे प्रभावी चित्रण करण्यात आले.





'काळ भूत'मधून वर्तमानात जगण्याचा संदेश

अभय नवाथे लिखित आणि किशोर येळणे दिग्दर्शित 'काळ भूत' या नाटकातून भूतकाळातील दुःखद अनुभव आणि वर्तमानातील संघर्षांचा वेध घेण्यात आला आहे. करिअरमधील अपयशामुळे निराश झालेला तरुण आणि भावनिक जखमा सोसणारी तरुणी यांच्या भेटीतून उलगडणाऱ्या या नाटकात विनोद, भावनिक गुंतागुंत आणि प्रेमाची किनार आहे. भूतकाळात न अडकता वर्तमानात जगण्याचा संदेश नाटकातून देण्यात आला आहे. यात किशोर येळणे, सेजल शिंदे, नेत्रा कुकडे, अनिकेत रामेकर यांनी भूमिका साकारल्या. पार्श्वसंगीत रोशन तडस, प्रकाशयोजना ऋषभ धापोडकर यांनी केले.

'दृष्टांत'मधून श्रद्धा, भक्ती आणि आत्मशोधाचा प्रवास

आर. एस. मुंडले धरमपेठ कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर प्रस्तुत अभय नवाथे लिखित असिधारा लांजेवार दिग्दर्शित 'दृष्टांत' या एकांकिकेतून श्रद्धा-अंधश्रद्धा, कर्मकांड आणि खऱ्या भक्तीतील फरक मांडण्यात आला आहे. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील वारकरी स्त्री आणि गुरुजी यांच्या संवादातून संत तुकोबा आणि आवली यांच्या जीवनातील प्रसंगांच्या माध्यमातून भक्तीचे तत्त्वज्ञान उलगडण्यात आले आहे. माणसाच्या जगण्यात आणि मनःशांतीतच खऱ्या विठ्ठलाचा साक्षात्कार होतो, हा संदेश एकांकिकेतून देण्यात आला आहे. विनय मोडक, दीपलक्ष्मी दिलीप भट, प्रणित घरोटे, भूमी राऊत यांनी भूमिका साकारल्या आहेत. नेपथ्य व प्रकाशयोजना स्वप्नील बोहटे, पार्श्वसंगीत अनिरुद्ध देशपांडे, अभिषेक चौरावर यांनी केले.

'ओमेगा: बियॉन्ड ह्युमन'मधून कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेध

देवरावजी कुबडे सेवा प्रतिष्ठान प्रस्तुत चंद्रकांत चौधरी लिखित व भावना चौधरी दिग्दर्शित ओमेगा (बियॉन्ड ह्युमन) या एकांकिकेतून कृत्रिम बुद्धिमत्ता, मानवी संवेदना आणि भविष्यातील तंत्रज्ञानाच्या संभाव्य धोक्यांचा वेध घेण्यात आला आहे. मानवी भावना ओळखणारे रोबोट्स आणि मानव यांच्यातील नातेसंबंध तसेच रोबोट्स हायजॅक झाल्यास मानवजातीसमोर निर्माण होणाऱ्या धोक्यांचे चित्रण यात करण्यात आले आहे. शार्दूल मोहरील, भावना चौधरी, डॉ. सागर देशपांडे, प्रणोती अरेकर यांनी भूमिका साकारल्या. संगीत सेजल शिंदे, प्रकाशयोजना प्फुल्ल धापोडकर यांनी केले.

'अश्विनी कार्तिक'मधून जगण्याची नवी उमेद

गंधर्व बहुउद्देशीय संस्था, अमरावती प्रस्तुत सचिन मधुकरराव गोटे लिखित 'अश्विनी कार्तिक' या एकांकिकेतून सोशल मीडियाचा प्रभाव, कौटुंबिक नातेसंबंध आणि मानसिक तणावाचा वेध घेण्यात आला आहे. रील्स बनवणारी अश्विनी आणि वैवाहिक समस्यांमुळे मानसिक तणावात असलेला कार्तिक यांच्या संवादातून नात्यांतील विश्वास, समजूतदारपणा आणि भावनिक आधाराचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. कार्तिकच्या अनुभवांमुळे अश्विनी आत्महत्येचा विचार सोडून सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारते. शिवानी विनोद ठाकरे, सौरभ शिवकुमार शेंडे यांनी भूमिका साकारल्या.

दिग्दर्शक व प्रकाशयोजना दीपक सुभाषराव नांदगावकर, पार्श्वसंगीत प्रथमेश हाते, नेपथ्य शंतनू सोलव, आकाश चव्हाण, रंगभूषा व वेशभूषा ममता दीपक नांदगावकर यांनी केले.

थोडक्यात

एस-१४ वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी लागणार!

नोव्हेंबरचे वेतन सुधारित वेतनश्रेणीनुसार काढणार; चार दिवसांत तालुकास्तरीय वेतननिश्चिती कॅम्प आयोजित करण्याचे गटशिक्षणाधिकारी गणेश टाकसाळे यांचे आश्वासन, शिक्षक समिती शाखा देवरीच्या निवेदनाला सकारात्मक प्रतिसाद, सेवापुस्तके मंजुरीसाठी याच महिन्यात कॅफोकडे पाठविणार



दे. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे-सालेकसा

प्राथमिक शिक्षकांच्या सुधारित एस-१४ वेतनश्रेणीच्या वेतननिश्चितीचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा देवरीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. माहे नोव्हेंबरचे वेतन सुधारित एस-१४ वेतनश्रेणीनुसारच काढण्यात येईल, असे ठोस आश्वासन गटशिक्षणाधिकारी गणेश टाकसाळे यांनी शिक्षक समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिले. तसेच येत्या चार दिवसांत तालुकास्तरावर वेतननिश्चिती कॅम्प आयोजित करून संबंधित शिक्षकांच्या वेतननिश्चितीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा देवरीच्या वतीने एस-१४वेतनश्रेणीच्या अंमलबजावणी संदर्भात गटशिक्षणाधिकारी गणेश टाकसाळे यांना निवेदन सादर करण्यात आले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी एस. जी. वाघमारे उपस्थित होते. २९ फेब्रुवारी २०२४ च्या सुधारित शासन निर्णयानुसार जिल्हा परिषद गोंदिया अंतर्गत प्राथमिक शिक्षकांना मुख्याध्यापक पदाची सुधारित एस-१४ वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. सदर लाभ २००२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने आदिवासी व नक्षलग्रस्त भागात कार्यरत शिक्षकांना देय आहे. त्यामुळे संबंधित शिक्षकांची सन २००२ पासून सुधारित वेतननिश्चिती करून वेतनातील फरकाची थकबाकी मिळण्यासाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो), जिल्हा परिषद गोंदिया यांची मंजुरी आवश्यक आहे.

याच पार्श्वभूमीवर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांच्या आदेशानुसार संबंधित शिक्षकांची वेतननिश्चिती तातडीने पूर्ण करून सेवापुस्तके मंजुरीसाठी कॅफो कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावर गटशिक्षणाधिकारी टाकसाळे यांनी सकारात्मक भूमिका घेत चार दिवसांत वेतननिश्चिती कॅम्प घेण्याचे आणि सर्व संबंधित शिक्षकांची सेवापुस्तके याच महिन्यात मंजुरीसाठी कॅफोकडे पाठविण्याचे आश्वासन दिले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके, तालुकाध्यक्ष गजानन पाटणकर, तालुका सरचिटणीस मिथुन चव्हाण, सुरेश कश्यप, रामेश्वर वाघाडे, सतीश भोंडगे, विनोद बहेकार, मुकेश गणवीर, धीरज शहारे, रवी जाधव, गणेश कांगणे, सचिन सांगळे, वीरेंद्र खोटेले, प्रिन्स गजभिये, नंदेश्वर कवास, अंकुश पवार, सुनील राठोड, पंकज राठोड, कु. सरोज निमजे यांच्यासह शिक्षक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; जिल्हास्तरावरही पाठपुरावा करणार!

शिक्षक समितीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे एस-१४ वेतननिश्चितीचा प्रश्न मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. शिक्षकांना नोव्हेंबर महिन्यापासून सुधारित वेतनश्रेणीचा लाभ मिळावा, यासाठी समिती आग्रही राहणार आहे. जिल्ह्यातील इतर तालुक्यांमधील संबंधित शिक्षकांचीही वेतननिश्चिती वेळेत पूर्ण व्हावी, यासाठी जिल्हा संघटनेच्या माध्यमातून तालुकानिहाय वेतननिश्चिती कॅम्प आयोजित करण्याची मागणी करण्यात येणार आहे. शिक्षक समितीच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देऊन प्रश्न निकाली काढण्याच्या दृष्टीने सहकार्य केल्याबद्दल जिल्हा परिषद अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व संबंधित विभागप्रमुखांचे शिक्षक समितीच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

प्रवेश अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख ५ नोव्हेंबर

२१ वा बहुभाषिक नाट्य महोत्सव २३ नोव्हेंबरपासून

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कला सागर, नागपूर आणि विदर्भ हिंदी साहित्य संमेलनाच्या संयुक्त विद्यमाने २१ व्या बहुभाषिक नाट्य महोत्सव २०२६ चे आयोजन २३ ते २७ नोव्हेंबर दरम्यान सीताबर्डी येथील हिंदी मोरभवनच्या स्व. रामगोपाल माहेश्वरी सभागृहात होणार आहे. महोत्सवात सहभागी होण्यास इच्छुक संस्थासाठी प्रवेश अर्ज जमा करण्याची अंतिम तारीख ५ नोव्हेंबर २०२६ निश्चित करण्यात आली आहे. या महोत्सवात नागपूर शहर आणि विदर्भभरातील सर्व नाट्य संस्था सहभागी होणार आहेत. नाट्य संस्था कोणत्याही भाषेत नाटक सादर करू शकतात.

सहभागी संस्थांना रंगमंच, प्रकाश योजना आणि ध्वनी योजना आयोजकांतर्फे मोफत उपलब्ध करून दिली जाईल. अधिक माहितीसाठी कला सागरचे मुख्य संरक्षक व सचिव पदम नायर (९४२१७०६६१०), कोषाध्यक्ष डॉ. रमेश बारस्कर (८८८८४२३८३३३३) तसेच वरिष्ठ सदस्य व वरिष्ठ कलाकार सुरेश सांगोळकर (९८२२९१२६६१) यांच्याशी संपर्क साधावा.



इंदिराबाई बबनराव कछवाहा इनका देहांत

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

तेलीपुरा सीताबर्डी निवासी इंदिराबाई बबनराव कछवाहा (७९) का निधन हो गया उनका अंतिम संस्कार ५ नवंबर को मोक्षधाम पर दोपहर १२ बजे किया जाएगा। वे अपने पीछे भरा पूरा परिवार छोड़ गई है

शहराच्या विकास प्रकल्पांचा महापौरांकडून आढावा

प्रकल्प त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

मनपाचा टाऊन हॉलसह शहरातील निमार्णाधीन प्रकल्प त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी अधिकाऱ्यांना दिले. हिवाळी अधिवेशनाच्या काळात मनपाच्या टाऊन हॉल सह विविध प्रकल्पांचे लोकार्पण करण्याच्या दृष्टीने महापौरांनी प्रकल्पांचा आढावा घेतला. तसेच ज्या कामांना राज्य सरकारच्या निधीची आवश्यकता आहे. त्या प्रकल्पांसाठी पाठपुरावा करण्याचे निर्देश महापौरांनी यावेळी दिले.

शहरातील विकास प्रकल्पांच्या स्थितीची माहिती महापौर श्रीमती निता ठाकरे यांनी मनपाच्या अधिकाऱ्यांकडून आज (ता. ४) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती सभागृहात पार पडलेल्या बैठकीत घेतली. यावेळी उपमहापौर लिला हाथीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दाणी-वखरे, सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर, आयुक्त डॉ. विपीन यांच्यासह अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, क्रीडा विशेष समिती सभापती दर्शनी धवड, वैद्यकीय सेवा व आरोग्य विशेष समिती सभापती मनीष अतकरे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी सदाशिव शेळके, मुख्य अभियंता लिना उपाध्ये, अधीक्षक अभियंता नरेश बोरकर, विजय गुरुबक्षानी, उपायुक्त राजेश भगत, उपायुक्त गणेश राठोड, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, शिक्षणाधिकारी अमित भदाणे, मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. राजेंद्र उचके यांच्यासह सर्व विभागाचे कार्यकारी अभियंता उपस्थित होते.

टाऊन हॉलच्या बांधकामाला गती

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या काळात काही प्रकल्पांचे लोकार्पण करण्याच्या दृष्टीने तयारीला वेग देण्याचे निर्देश महापौर श्रीमती ठाकरे यांनी अधिकाऱ्यांना यावेळी दिले. मनपाच्या महाल भागात उभारण्यात येत असलेल्या राजे



रघुजी नगर भवनाच्या (टाऊन हॉल) बांधकामाचा सविस्तर आढावा यावेळी घेण्यात आला. उर्वरित कामे त्वरित पूर्ण करून हिवाळी अधिवेशनाच्या काळात या टाऊन हॉलचे लोकार्पण करण्याच्या दृष्टीने कामाला वेग द्यावे, असे निर्देश महापौरांनी यावेळी दिले.

मिनीमातानगर भागातील प्रस्तावित हॉस्पिटल तसेच क्वेटा कॉलनीतील देवडीया हॉस्पीटलचे कामे पूर्णत्वात जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. नरेंद्रनगरात फूड कोर्ट उभारणे तसेच वर्धा मार्गावरील प्राईड हॉटेल समोरील रा. स्व. संघाचे प्रथम सरसंघचालक डॉ. हेडगेवार चौकाचे सौंदर्यीकरण करून तेथे फाऊंटेन उभारण्याच्या काम पूर्ण करण्याचा आढावा घेण्यात आला. त्याचप्रमाणे भांडेवाडी भागातील फिश मार्केटचे बांधकाम डिसेंबर महिन्यात पूर्ण होणार असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले.

भांडेवाडी परिसरात उभारण्यात येत असलेल्या मोकाट श्वानासाठी उभारण्यात येत असलेल्या डॉग शेल्टरचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे यावेळी सांगण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण करणे, जखमी व आजारी श्वानांवर उपचार करून त्यांना सोडून देणे यासाठी हे डॉग शेल्टरमध्ये होणार आहे, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

मनपाचे मुख्य द्वार त्वरित पूर्ण करा- बोरकर

मनपाच्या मुख्यालयातील मुख्य प्रवेशद्वाराचे काम त्वरित पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी सत्ता पक्षनेता नरेंद्र (बाल्या) बोरकर यांनी दिले. हिवाळी अधिवेशन असल्याने त्यापूर्वी मनपाचे मुख्य प्रवेश द्वार सुरू होणे आवश्यक असल्याचे श्री. बोरकर यांनी सांगितले.

वर्किंग वुमन होस्टेल

जयताळा परिसरात उभारण्यात येत असलेल्या वर्किंग वुमन होस्टेलचे काम अंतिम टप्प्यात असून हे काही महिन्यातच पूर्ण होणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यावेळी शहरात होणाऱ्या लकडगंज, केटीनगर, जुना बगडगंज व गंजीपेठ येथील अग्निशमन केंद्रांच्या कामचाही आढावा घेण्यात आला. उंच इमारतीला लागलेली आग विझविण्यासाठी सक्षम यंत्रसामुग्री खरेदी करण्याचे प्रस्तावावर यावेळी चर्चा करण्यात आली.

जिजाऊ सेंटरचे बांधकाम पूर्ण करा

शंकरनगरात स्वयंसहायता बचत गटाच्या महिलांसाठी उभारण्यात येत असलेले जिजाऊ सेंटरचे बांधकामाचा आढावा यावेळी घेण्यात आला. महिलांच्या सक्षमीकरणासाठी या सेंटरचा उपयोग होणार आहे.

अधिकारी व कर्मचार्यांमध्ये संवाद हवा

विकास कामे करताना अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे, असे महापौर श्रीमती ठाकरे यांनी सांगितले. त्यांनी प्रकल्पांच्या कामामध्ये होणाऱ्या विलंबावर आपली नाराजी व्यक्त केली. तसेच प्रकल्पाचे लोकार्पण होण्याकरिता सर्व विभागाचे एनओसी प्राप्त करून घेण्याचे अधिकाऱ्यांना सांगितले.

पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रियेला मिळाली गती

शिक्षण विशेष समिती सभापती संतोष देवी दीपक लड्ढा यांच्या प्रयत्नांतून महत्त्वपूर्ण पुढाकार

दे. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या पवित्र पोर्टलवरील शिक्षक भरती प्रक्रियेच्या रूपांतरित फेरीअंतर्गत उर्दू माध्यमाच्या विनाअनुदानित शाळेतील इंग्रजी विषयाच्या शिक्षक पदासाठी फैजान रहेमान शेख यांची अधिकृतरीत्या शिफारस करण्यात आली आहे.

सदर शिफारशीच्या अनुषंगाने मनपा आयुक्त डॉ. विपिन यांच्या सक्षम मान्यतेने फैजान रहेमान शेख यांना शिक्षण सेवक पदावर नियुक्त होऊन कार्यभार स्वीकारण्यासाठी नियुक्ती आदेश प्रदान करण्यात आला. हा नियुक्ती आदेश शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी दीपक लड्ढा आणि शिक्षणाधिकारी अमित भदाणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी शिक्षण विशेष



समिती सभापती संतोषदेवी दीपक लड्ढा यांनी नवनियुक्त शिक्षण सेवक फैजान रहेमान शेख यांना हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांच्या उज्वल भविष्यासाठी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

२९ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेला मिळाली गती

नागपूर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात सन १९९७ पासून इयत्ता ९ वी व १० वीच्या शिक्षक भरतीसंदर्भातील पवित्र पोर्टलची प्रक्रिया दीर्घकाळापासून प्रलंबित होती. जवळपास २९ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या प्रक्रियेला शिक्षण सभापती संतोष देवी दीपक लड्ढा यांच्या विशेष प्रयत्नांमुळे आणि पुढाकारामुळे प्राधान्याने गती देण्यात येत आहे. या महत्त्वपूर्ण कार्यात अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम. आणि शिक्षणाधिकारी अमित भदाणे यांचे विशेष सहकार्य व मार्गदर्शन लाभत आहे. तसेच उपशिक्षणाधिकारी सुभाष उपासे आणि उपशिक्षणाधिकारी सीमा खोब्रागडे यांच्यासह शिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांच्या समन्वयातून ही प्रक्रिया वेगाने पुढे नेली जात आहे.

शिक्षण विशेष समिती सभापती संतोषदेवी लड्ढा यांनी सांगितले की, इयत्ता ६ वी, ७ वी आणि ८ वीच्या माध्यमिक स्तरावरील शिक्षक भरतीसंबंधित माहिती (डेटा) देखील लवकरात लवकर पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. यासोबतच प्राथमिक विभागातील शिक्षक भरतीसंबंधित माहिती (डेटा) देखील लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने काम सुरू आहे. त्यांनी अशी आशा व्यक्त केली की, आगामी दोन महिन्यांत या वर्गांचा डेटा पूर्ण करून पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रिया पुढे नेणे शक्य होईल. यामुळे महानगरपालिकेच्या शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर करण्यास तसेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देण्यास महत्त्वपूर्ण मदत होईल.

शिक्षण सभापती संतोष देवी दीपक लड्ढा यांनी सांगितले की, नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांची उपलब्धता सुनिश्चित करणे आणि विद्यार्थ्यांना अधिक चांगले शैक्षणिक वातावरण उपलब्ध करून देणे हे त्यांचे प्राधान्य आहे. या दिशेने शिक्षण विभागातील सर्व अधिकाऱ्यांच्या सहकार्याने आणि समन्वयाने भरती प्रक्रियेला गती देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत.

एस-१४ वेतनश्रेणी लागू करण्यासाठी शिक्षक समितीचे गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन!

नोव्हेंबर २०२६ चे वाढीव वेतन सुधारित वेतनश्रेणीनुसार देण्याची मागणी; महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा सालेकसाचा पुढाकार



दे. सिंहवाणी वृत्त, राजु फुंडे- सालेकसा

शिक्षकांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांना न्याय मिळावा आणि एस-१४ वेतनश्रेणीचा लाभ पात्र शिक्षकांना तातडीने मिळावा, यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा सालेकसाच्या वतीने गटशिक्षणाधिकारी विशाल डोंगरे यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनातून पात्र शिक्षकांना एस-१४ वेतनश्रेणी लागू करून नोव्हेंबर २०२६ चे वेतन सुधारित वेतनश्रेणीनुसार वाढीव स्वरूपात अदा करण्यात यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली.

शिक्षकांना नियमानुसार वेतनश्रेणीचा लाभ मिळत नसल्याने त्यांच्या आर्थिक हिताचा प्रश्न निर्माण झाला असून, प्रशासनाने या प्रकरणी सकारात्मक निर्णय घेऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी भूमिका शिक्षक समितीने मांडली. यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे जिल्हानेते सतीष दमाहे, तालुकाध्यक्ष पी.एम. ढेकवार, सरचिटणीस एस. डी. रहांगडाले, जयेश लिल्हारे, सचिन गायधने, बी.जी.बुलाखे, सुनील बहेटवार,सानप, ए.जी.काळुसे, अधीक्षक भरत खजूरिया, लिपीक गौतम, पौर्णिमा पवार आणि समिती चे इतर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी एस-१४ वेतनश्रेणी व वेतन निश्चिती प्रक्रियेबाबत सविस्तर चर्चा करून संबंधित शिक्षकांना न्याय मिळवून देण्याची मागणी करण्यात आली. एस-१४ वेतनश्रेणीचा प्रश्न मार्गी लागून पात्र शिक्षकांना नोव्हेंबर महिन्यापासून सुधारित वेतनाचा लाभ मिळावा, यासाठी शिक्षक समितीने प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू केला आहे.

पीएम श्री जि.प. उच्च प्राथमिक शाळा दहेगाव येथे आकाश कंदील स्पर्धेतून पर्यावरणपूरक दिवाळीचा संदेश

दे. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मोदा

पीएम श्री जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, दहेगाव येथे दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर भव्य आकाश कंदील निर्मिती कार्यशाळा व प्रदर्शन आयोजित करण्यात आले.

उपक्रमाचे वैशिष्ट्य :

स्वनिर्मितीतला प्रोत्साहन: बाजारातून विकत न आणता, मुलांनी घरी आई-वडिलांच्या मदतीने टाकाऊ पुठ्ठा, रंगीत कागद, दोरा यापासून कंदील बनवले.

सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग: इयत्ता १ ली ते ८ वी च्या सर्व



विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. सर्व विद्यार्थी अतिशय आनंदीपणे या उपक्रमात सहभागी झाले होते.

कल्पकतेला वाव: प्रत्येक कंदील वेगवेगळ्या आकाराचा. कोणी गोल, कोणी चौरस, कोणी कमळाच्या आकाराचा बनवला होता.

दिवाळीत आकाश कंदीलाचे महत्त्व :

आकाश कंदील हे अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचे प्रतीक आहे. दिवाळी म्हणजे दीपोत्सव. आकाशात लावलेला कंदील हा आकाशातील देवतांना मार्ग दाखवतो अशी मान्यता आहे. हा आपल्या भारतीय संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे.

शालेय शिक्षणात याचे महत्त्व :

पुस्तकी शिक्षणासोबतच अशा कृती-आधारित शिक्षणामुळे मुलांच्या हाताला कौशल्य प्राप्त होते. यातून त्यांच्यातील कला, कल्पनाशक्ती, एकाग्रता वाढते. पीएम श्री योजनेअंतर्गत अशा आनंददायी शिक्षणावर भर दिला जात आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नितेश इंगळे होते. प्रास्ताविक व मार्गदर्शन मुख्याध्यापक वासुदेव भुते यांनी केले.वावीळी त्यांनी फटाके मुक्त दिवाळी साजरी करून प्रदूषण टाळण्याचे आवाहन मुलांना केले. कार्यक्रमाला धानला केंद्रप्रमुख राजु आंबिलकर, शिक्षकवृंद सुधीर कांबळे, सुधीर खंडाईत, राजेश रोहाड,, कु. प्रज्ञा रामटेके, सुजाता बोदेले, ज्योती आंबिलढुके, संगीता आंबिलढुके, पुष्पलता उके,उमेश उके, रंजना उके उपस्थित होते.

स्पर्धेत उत्कृष्ट कंदील बनवणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करण्यात आले व सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. संचालन शिक्षकसुधीर कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन शिक्षिका कु. प्रज्ञा रामटेके यांनी केले.

शब्दवेली
साहित्य विशेष
दैनिक
सिंहवाणी वृत्त
७ दिनांक : गुरूवार, ५ नोव्हेंबर २०२६
Mail Id : sinhvanivrutta@gmail.com
Epaper : epaper.sinhvani.com

दुष्काळाचे आव्हान कसे पेलणार

सुनील कुवरे, शिवडी (मुंबई)

दुष्काळ तसा महाराष्ट्राला नवीन नाही. दर सात - आठ वर्षांनी महाराष्ट्राला दुष्काळ सदश परिस्थिला किंवा भीषण दुष्काळाला सामोरे जावे लागते. यंदा प्रशांत महासागरात सुपर एल निनो अधिक प्रभावित झाल्यामुळे महाराष्ट्रास देशातील बारा राज्यात सरासरी पेक्षा पाऊस कमी पडेल.असा अंदाज हवामान तज्ञांनी वर्तविला होता आता त्या अंदाजाची प्रचिती प्रत्यक्षात आली आहे. यामुळे पाणी टंचाई, महागाई, ऊर्जा, रोजगार आणि अर्थ व्यवस्थेवर गंभीर संकट तरू शकते. भारतासाठी ही केवळ हवामान खात्या तील नैसर्गिक घटना नसून देशातील काही भागात प्रचंड दुष्काळ पडू शकतो. अगोदरच ग्लोबल वार्मिंग मुळे पृथ्वी प्रचंड गरम झालेली आहे. अशा परिस्थितीत सुपर एल निनोमुळे पृथ्वीचे तापमान प्रचंड वाढले. गेल्या ७५ वर्षात सुपर एल निनोचा जो प्रभाव पाहायला मिळाला नाही. तो यंदा पाहायला मिळत आहे. हवामान तज्ञांनी इशारा दिल्या प्रमाणे महाराष्ट्रात २०२६ मध्ये सरासरीपेक्षा पाऊस कमी पडला. जून ते सप्टेंबर या तीन महिन्याच्या काळात राज्यात ७५५ मिमी पाऊस झाला. तर सरासरी ९३२.३ मिमी आहे, म्हणजे एकूण तूट १८.८ टक्के आहे. संपूर्ण खरीप पिकाच्या हंगामावर खर्च करून ही शेतकऱ्यांच्या हाती काहीही लागले नाही.

संपूर्ण खरीप पिकाचा हंगाम वाया गेला. सोयाबीन, कापूस, मूग आणि अन्य पिकांच्या उत्पादनावर परिणाम झाला आहे.पिण्याच्या पाण्या बरोबरच जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. कमी पावसामुळे मोठ्या, मध्यम व लघु प्रकल्पां मधील पाणी साठ्यात त्यामध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे आगामी रब्बी हंगाम आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होणार आहे. आताच ग्रामीण भागात लोकांना वणवण भटकंती करावी लागत आहे. शहरी भागात सुद्धा पाणी कपात करावी लागली आहे. जनावरांना चारा नाही.तेव्हा परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सरकारने ३५८ तालुक्या पैकी पहिल्यांदा २६५ तालुक्यात आणि नंतर ४० तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर केला आहे. हा दुष्काळ १९७२ पेक्षा अधिक गंभीर असली,तरी १९७२ नंतर परिस्थितीत खूपच बदल झाला आहे. परंतु प्रशासकीय निकषां नुसार एवढया मोठ्या प्रमाणावर एकाच वेळी तालुक्यांची संख्या नोंदवली गेली नव्हती. याचाच अर्थ राज्याच्या तब्बल ८५ टक्के भागात दुष्काळ पडला आहे. मराठवाडा, विदर्भ, तसेच पश्चिम महाराष्ट्रातील काही भाग हे नेहमी दुष्काळ सदश परिस्थिती असते. पण ज्या कोकणात जास्त प्रमाणात पाऊस पडतो. त्या कोकणात सुध्दा दुष्काळ ग्रस्त तालुके जाहीर करावे लागले. यावरून परिस्थिती किती भीषण होऊ शकते याचे संकेत मिळतात.. यावर्षी दुष्काळाचा फटका केवळ महाराष्ट्रा पुरता नाही तर महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यातील काही भागांना दुष्काळी परिस्थितीचा फटका बसणार आहे.

सरकारने दुष्काळावर मात करण्यासाठी अनेक घोषणा केल्या आहेत. जेथे पाऊस नाही तेथे शेत मजुरांचा रोजगाराची समस्या निर्माण होऊ नये म्हणून रोजगार हमी योजनेची कामे सुरू करणार, कर्ज वसुलीला स्थगिती, कृषिपंपाच्या वीजबिलात सवलत, विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ, टँकरने पाणी पुरवठा, जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था, दुष्काळग्रस्त भागात जमीन महसूल माफी. अशा आदी घोषणा केल्या आहेत. तसेच पीक नुकसानीचे पंचनामे करून त्वावर मदतीचा निर्णय घेतला जाईल,अशी भूमिका सरकारने घेतली आहे.राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी तून मदत मिळविण्यासाठी पंचनामे आवश्यक आहेत. पण पंचनाम्याची प्रक्रिया हा मदतीचा पर्याय होऊ शकत नाही. सरकारने दुष्काळग्रस्त गावांना टँकरने पाणी पुरवठा करण्याची घोषणा केली आहे, परंतु पाण्याचे साठे जसजसे संपतील तसतशी टँकर ग्रस्त गावांची संख्या वाढत जाणार आहे. सरकारने पिण्याचे पाणी पुरविण्याबाबत हमी घेतली असली, तरी ज्या शेतकऱ्यांचे संपूर्ण जीवन केवळ शेतीवरच अवलंबून आहे, अशा शेतकऱ्यांचे काय? सरकारचे सर्व लक्ष रोजगार हमी योजनांवर आहे. पण आजच्या काळात तुटपुंज्या रोजगार हमीवर जनतेची गुजरान होईल, अशी परिस्थिती सध्या नाही. कारण सरकारची आर्थिक परिस्थिती बरोबर नाही. अंदाजे ११ लाख कोटी रुपयांचे कर्ज डोक्यावर आहे. पुढे हे कर्ज वाढू शकते. कारण गेल्यावर्षी राज्यात अतिवृष्टीग्रस्तांना सुमारे ३२ हजार कोटी रुपयांची मदत जाहीर करण्यात आली होती. ती अजूनही काही शेतकऱ्यांना मिळालेली नाही. नुकतीच सरकारने शेतकऱ्यांना संकटातून बाहेर काढण्यासाठी ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचे 'पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर शेतकरी कर्जमाफी योजना मंजूर केली आहे.त्याचा फायदा जवळपास ५५ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. हा भार सरकारच्या डोक्यावर असताना, आता नव्याने दुष्काळाच्या योजनांचा भार येणार आहे.

देशात महाराष्ट्र एक आघाडीचे राज्य म्हणून ओळखले जाते. पण या राज्यातही मराठवाडा, विदभार्तील काही भाग, तसेच सोलापूर, नाशिक सांगली आदी काही भागातील काही तालुके हे सतत अवर्षणग्रस्त आणि दुष्काळग्रस्त असतात. पण सरकार हे मान्य करीत नाही. यंदा दुष्काळ क्षेत्र वाढले आहे. १९७२ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. त्याच्या कडवट आठवणी आजही जुन्या जाणत्या लोकां कडून जेव्हा ऐकायला मिळतात.

तेव्हा अंगावर शहारे येतात. १९७२ च्या दुष्काळावेळी राज्या कडे अन्नधान्याची प्रचंड कमतरता निर्माण झाली होती. अमेरिकेत जनावरांना चारा म्हणून घालण्यात येणारा गहू त्यावेळी रेशनच्या दुकानातून लोकांना देण्यात येत होता. तसेच हजारो नागरिक आणि पाळीव प्राण्यांचे जीव गेले होते. लोकांना शेती सोडून शहरांकडे स्थलांतरित झाले होते. यावेळी सुद्धा तशीच भीषण परिस्थिती निर्माण झाली आहे, यात शंका नाही. पावसाने ओढ दिल्याने पुढला उन्हाळ कसा जाईल ते सांगता येणार नाही. अन्नधान्यांचा साठा, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न, दुष्काळी कामे, सर्वात महत्त्वाचे म्हणजे पाण्याचा प्रश्न. असे असंख्य प्रश्न 'आ' वासून उभे राहणार आहेत.

मुंबईत जवळपास १६०० मिमी पाऊस पडतो. यंदा पुरेसा पाऊस झाला नाही. मे महिन्यापासून सुरू केलेली दहा टक्के पाणी कपात ती सुरूच राहणार आहे. कारण आज शहरात आलिशान मोठमोठे टॉवर उभे राहिले आहेत आणि राहत आहेत.मुंबईची लोकसंख्या गेल्या १५ वर्षात २.५० कोटीच्यावर गेली आहे. त्या तुलनेत मुंबईला पाणी पुरवठा करणाऱ्या धरणाची संख्या वाढली नाही. जी धरणे तलावे आहेत तीच आहेत. पाणी साठविण्यासाठी कोणतीही योजना आखली गेली नाही. अशीच परिस्थिती राज्याच्या इतर शहरात सुध्दा आहें. तसेच पाणी टंचाईच्या काळात टँकरने पाणी पुरवठा हा दुष्काळी भागातील लोकांना मोठा आधार असतो. प्रत्येक जिल्ह्याला आवश्यक प्रमाणात पाणी उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी असते.पण गेल्या काही वर्षात मोठया किंवा मध्यम धरणांची निर्मिती झाली नाही,हे खेदजनक आहे.आणि सरकार विकासाच्या गप्पा मारत असते.

२०१६ मध्ये फडणवीस मुख्यमंत्री असताना जलयुक्त शिवार अभियान योजना राबविण्यात आली. तसेच पाणी जिरवा पाणी अडवा ही योजना सुद्धा यशस्वी झाली नाही. ही योजना किती यशस्वी झाली हा एक प्रश्न आहे.राज्य सरकारने दुष्काळग्रस्तांसाठी ज्या योजना घोषित केल्या आहेत, त्यांची योग्यरीत्या अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.कारण सरकारने कितीही म्हटले तरी काही वेळा प्रत्यक्षात काहीही होत नाही.हा आजवरचा अनुभव आहे.

दुष्काळ, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी वादळे ही सर्व नैसर्गिक संकटे आहेत. अशा संकटात संकटग्रस्तांना धीर देण्याऐवजी संकटाचे राजकारण करण्याची सवय सत्ताधारी आणि विरोधी पक्षांना झाली आहे. असे म्हटले तर वावगे ठरू नये. दुष्काळग्रस्तांना प्रथम पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, रोजगार हमी योजना, जीवनावश्यक सुविधा तातडीने दिल्या पाहिजेत. नाही तर लाखो दुष्काळग्रस्त कुटुंबे शहराकडे स्थलांतर करण्याची शक्यता आहे. तो दुष्काळात तेरावा महिना ठरेल. ते स्थलांतर रोखण्यासाठी जाहीर केलेल्या प्रयत्न केले जावेत. निकष बाजूला ठेवून शेतकऱ्याला प्रति हेक्टरी जास्तीत जास्त मदत करण्यात यावी.

- ९१६७३६४८७०

दीपावली

काढा जीर्ण-जळमटे सगळी
अन करा स्वच्छता घरातली
सजवा घरांगण दीपमाळांनी
आली आज मंगल दीपावली

अवसेच्या घन गर्द तिमिरात
घेऊन प्रकाश सोबती आली
करून आरास लक्ष ज्योतींची
उजळा घरदार मने अंधारली

सोडूनीया सारे रुसवे फुगवे
प्रेमाने जोडा हृदये आपली
दीपावलीच्या प्रकाश पर्वात
सुखस्वप्नं पहा भविष्यातली

गोड फराळी जिन्नसांसोबतच
गोडी टिकून राहो नात्यांतली
सुख शांती आरोग्य धनलाभ
देवो सर्वां हि मंगल दीपावली

- गणेश पांडे, नागपूर
मो. ९५०३३५०५७४

एक दिवसीय पर्यटनासाठी एक सुंदर ठिकाण भंडारा जिल्ह्यातील "रावणवाडी जलाशय"

- गणेश पांडे, नागपूर
मो. ९५०३३५०४७४

नमस्कार मित्रांनो,

रोजच्या नियमित व्यस्ततेतुन साप्ताहिक सुटीच्या अथवा एखाद्या सार्वजनिक सुटीच्या दिवशी घराबाहेर पडण्याची आपल्या पैकी बहुतेकांनाच इच्छा असते व घरच्या मंडळींना सुद्धा एक दिवस आपल्या रोजच्या त्याच त्या दिनचर्येतून थोडा बदल हवासा वाटतो. अशा वेळी बाहेर एखाद्या जवळपासच्या नैसर्गिक वा धार्मिक पर्यटन स्थळी जाऊन एक दिवस आनंदात घालवण्याचा एक सोपा व उत्तम पर्याय आपण शोधत असतो. असाच आपल्याला आवडेल असा एक उत्कृष्ट पर्याय आहे भंडारा शहराजवळील " रावणवाडी जलाशय" आणि आपण जर नागपूर वा भंडारा येथून असाल तर, नक्कीच आपल्यासाठी रावणवाडी हे एक दिवसीय पर्यटनासाठी सर्वच दृष्टीने खरोखरच योग्य ठरणारे ठिकाण आहे. नागपूर पासून रोड मार्गाने ८० कीलोमीटर व भंडाऱ्यापासुन २० कीलोमीटर असलेले रावणवाडी हे एक निसर्ग सुंदर व रमणीय पर्यटन स्थळ आहे जेथे आपण वैयक्तिक, कौटुंबिक कींवा सामुहिक पर्यटनाचा मनसोक्त आनंद घेऊ शकतो.

भंडारा जिल्ह्यातील रावणवाडीची पर्यटन स्थळ म्हणून ओळख आहे ती तेथे असलेला रावणवाडी धरण वा जलाशयामुळे व जलाशयाच्या आजुबाजुला असलेल्या टेकड्यांमुळे निसर्गतःच लाभलेल्या त्याच्या नैसर्गिक सुंदरतेमुळे. १९६० मधे एका वाहत्या ओढ्यावर आजुबाजूच्या गाव परीसरासाठी पाणीपुरवठा व जलसिंचन या उद्देशाने हे धरण बांधले गेले. मातीच्या या मध्यम आकाराच्या धरणाच्या बांधाची लांबी अंदाजे ९६ मीटर (३१५फुट) आहे. विस्तिर्ण पसरलेल्या या जलाशयाच्या तीन बाजूंनी असलेल्या हिरव्या गार टेकड्या एक नयनरम्य चित्र सदश्य देखावा आपल्या डोळ्यासमोर उभ्या करतात व एका बाजूला असलेला मोकळा बीच वा चौपाटीवजा लांब किनारा आपल्याला, जणू काही, समुद्रकीनारी गोव्यात असल्याची प्रचिती देतो. जलाशयात बोटींगची व्यवस्था असल्याने जल पर्यटनाची आवड असलेल्या पर्यटकांना हे ठिकाण आपल्याकडे विशेषत्वाने आकर्षित करणारे आहे आणि अशा या चहुबाजूंनी सुंदरतेने नटलेल्या जलाशयात बोटींग करतांना जलपर्यटनाची जी आनंददायी अनुभुती आपल्याला येते ते शब्दात वर्णन न करता येणारे जलपर्यटनाचे आनंदपर्व असते, जे स्वतः अनुभवल्या शिवाय सांगता यायचे नाही. भरीस भर येथे आपल्यासाठी घोड्यावर बसून रपेट मारण्याचा व मोटार बाईक राइडचा सुद्धा आनंद घेण्याची सोय आहे, तसेच मुलांसाठी विविध खेळ,पार्कींगसाठी मोकळी जागा, चहा, नाश्ता व जेवणाचे स्टाल्स असल्याने पर्यटन वा सहलीचा पुरेपूर आनंद व आस्वाद आपण येथे घेऊ शकतो.



या व्यतिरिक्त येथे जलाशयाच्या बाजूला एका उंच टेकडीवर रामाचे १०० अंदाजे वर्षे जुने मंदिर आहे, तसेच पायथ्याला अंबा मातेचे सुंदर मंदिर आहे, सोबतच श्री दत्तात्रेय मंदिर व हनुमंताचे मंदिर आहे त्यामुळे निसर्ग व जल पर्यटनासोबतच धार्मिक पर्यटन सुद्धा येथे आपल्याला घडते आणि येथे एक सुंदर उद्यान सुद्धा तयार केले आहे जेथे लहान मुलांना खेळण्यासाठी बरीच खेळण्याची सामुग्री उपलब्ध आहे. जलाशयाच्या बांधावरून अवलोकन करताना जलाशयाच्या पार्श्वभूमीवर दिसणारे सभोवतीचे सुंदर निसर्ग चित्र आपल्याला भुरळ पाडणारे असते. तसेच जल व जंगल यांच्या अनोख्या संगमामुळे निरनिराळ्या पक्षांचे हे आवडते वस्तीस्थान आहे त्यामुळे जंगल प्रेमींसाठी जंगल भ्रमंती व पक्षी प्रेमींसाठी पक्षी निरीक्षणासाठी हे एक हमखास भेट देण्यासारखे ठीकाण आहे. येथे सभोवताली असलेल्या उंच टेकड्यांमुळे हौशी ट्रेकींग प्रेमींना सुद्धा साहसिक पर्यटनासाठी आकर्षित करणारे हे आवडते ठिकाण आहे.

अशा प्रकारे सर्वच प्रकारच्या पर्यटनासाठी व एक दिवसीय वैयक्तिक कौटुंबिक अथवा सामुहिक सहलीसाठी अथवा भ्रमंती साठी भंडारा जिल्ह्यातील रावणवाडी हे निश्चितच एक उत्कृष्ट व आदर्श पर्यटन ठिकाण आहे.

वसुबारसचे महत्त्व - दिवाळीची मंगलमय सुरुवात



!! जय ज्योती जय सावित्री !!

भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणाला एक विशेष महत्त्व आहे. दिवाळी हा आनंद, उत्साह, मांगल्य आणि प्रकाशाचा सण. या दीपोत्सवाची सुरुवात वसुबारस या पवित्र सणाने होते. आश्विन महिन्यातील कृष्ण पक्षातील द्वादशीला वसुबारस साजरी केली जाते. या दिवसाला गोवत्स द्वादशी असेही म्हणतात.

वसुबारस हा सण गोमातेप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. भारतीय संस्कृतीत गायीला मातेचे स्थान दिले गेले आहे. गाय केवळ एक पशू नसून ती शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था आणि मानवी जीवनाचा महत्त्वाचा आधार राहिली आहे. तिच्यापासून मिळणारे दूध आणि शेतीसाठी उपयुक्त असलेले गोमय यांना पारंपरिक जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. त्यामुळे गोमातेची पूजा करून तिच्याविषयी आदर आणि कृतज्ञता व्यक्त केली जाते.

या दिवशी गाय आणि वासराला स्नान घालून त्यांची सजावट केली जाते. फुले, हळद-कुंकू वाहून पूजा केली जाते. नैवेद्य अर्पण केला जातो. घरातील महिला कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करतात. अनेक ठिकाणी गायीच्या पायांशी दिवा लावून मंगलमय वातावरण निर्माण केले जाते. कृतज्ञतेच्या भावनेतून दिवाळीच्या आनंदपर्वाची सुरुवात करूया. सर्वांना वसुबारस आणि दीपोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!

आधुनिक युगातही या सणामागील कृतज्ञतेची भावना जपणे गरजेचे आहे. पशुधनाचे संरक्षण, त्यांची योग्य काळजी आणि संवर्धन ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

दिवाळीची सुरुवात करणारा हा सण आपल्या जीवनात प्रेम, माया, समृद्धी आणि माणुसकीचा प्रकाश घेऊन येतो. दिव्यांच्या प्रकाशाबरोबरच आपल्या मनातील संवेदनशीलतेचा दीपही प्रज्वलित व्हावा, हाच वसुबारसचा खरा संदेश आहे. चला तर मग, या वसुबारसेला केवळ गोमातेचे पूजन न करता प्रत्येक मुक्या जीवाविषयी प्रेम, आदर आणि संवेदना जपूया.

- सौ. माधुरी धनोकार, अकोला

माणुसकीचा दीप उजळूया!

शशिकांत तोटे
दारव्हा, जि.यवतमाळ

दिवाळी हा केवळ सण नव्हेतर पारंपारिक, धार्मिक आणि मानवतावादी मूल्ये जोपासणारे, आनंद, उत्साह, मांगल्य आणि प्रकाशाचा सण आहे.अंधारावर प्रकाशाचा, अज्ञानावर ज्ञानाचा प्रकाश आणि निराशेवर आशेचा विजय म्हणजे दिवाळी.या सणानिमित्त प्रत्येक घरात दिव्यांची रोषणाई केली जाते, रांगोळ्या काढल्या जातात आणि गोडधोड पदार्थ बनवले जातात. मात्र, आपल्या समाजात आजही अनेक गरीब, गरजू आणि वंचित कुटुंबे आहेत,ज्यांना दोन वेळचे जेवण मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो.त्यांच्या जीवनात आनंदाचा प्रकाश निर्माण करणे, हीच खऱ्या अर्थाने दिवाळीची मानवतावादी संस्कृती आहे.

हाच खरा दिवाळी सणाचा सांगावा आहे. यंदा राज्यातील बहुतांश भागात दुष्काळाचे भीषण सावट आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था आणि जीवनमान कोडींत सापडलेले आहे. अशावेळी सधन हातांनी मदतीचा हात मोकळा करायला हवा. वर्तमान स्थितीत दिवाळीच्या निमित्ताने आपण अनेक ठोस उपक्रम राबवू शकतो. गरजू कुटुंबांना धान्य, तेल,साखर, डाळी आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किराणा किटचे वाटप करता येईल. गरीब मुलांना नवीन कपडे, शालेय साहित्य, वह्या-पुस्तके आणि शैक्षणिक साहित्य देऊन त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवता येईल. अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमांना भेट देऊन तेथील मुलांना मिठाई, फळे व कपडे देता येतील,तसेच ज्येष्ठ नागरिकांसोबत वेळ घालवून त्यांना आपुलकीचा आधार देता येईल.

याशिवाय, 'एक कुटुंब,एक मानवतावादी सहाय्य' हा उपक्रम राबवून प्रत्येक कुटुंबाने



एका गरजू कुटुंबाला दिवाळीच्या वस्तू द्याव्यात. 'आनंदाची दिवाळी' या उपक्रमांतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल मुलांसाठी फराळ,खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील.गरजू रुग्णांना औषधोपचारासाठी मदत करणे, रक्तदान शिबिरे आयोजित करणे, स्वच्छता मोहीम राबवणे आणि स्थानिक कारागिरांकडून पणत्या खरेदी करून त्यांना रोजगार मिळवून देणे,हेही समाजोपयोगी उपक्रम आहेत. मदत करताना कोणाच्याही स्वाभिमानाला ठेच पोहोचणार नाही,याची काळजी घेणे आवश्यक आहे.

मदतीचे प्रदर्शन न करता संवेदनशीलतेने मदतीचा हात पुढे करणे,हीच खरी माणुसकी ठरते. शेवटी,दिवाळी केवळ दिव्यांनी घर उजळवण्याचा सण नसून, गरजूंच्या जीवनात आशा आणि आनंद निर्माण करण्याची संधी आहे.चला,या दिवाळीत आपणही एखाद्या गरजू कुटुंबाच्या चेहऱ्यावर हास्य फुलवूया; कारण दिव्यांचा प्रकाश घर उजळवतो, तर माणुसकीचा प्रकाश संपूर्ण समाज उजळवतो.

मो : ९१३०८३५४५८

उद्योगांच्या सामाजिक उपक्रमांचे राज्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : कृषी, आरोग्य, महिला सक्षमीकरण क्षेत्रात गोदरेज इंडस्ट्रीज करणार २५ कोटींहून अधिक रुपयांची गुंतवणूक

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासासाठी राज्य शासन प्रयत्नशील असून, उद्योग क्षेत्राच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांमुळे या प्रयत्नांना बळ मिळत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

गोदरेज इंडस्ट्रीज समूहाच्या 'गुड अँड ग्रीन' उपक्रमांतर्गत राज्यात सार्वजनिक आरोग्य, महिला सक्षमीकरण, बांधकाम कामगार कल्याण, कृषी विकास आणि पर्यावरण संवर्धनासाठी पुढील तीन वर्षांत २५ कोटी रुपयांहून अधिक गुंतवणूक करण्यात येणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले,गोदरेज समूहाचा महाराष्ट्राशी १२० वर्षांहून अधिक काळाचा संबंध असून, राज्यातील विविध सामाजिक विकास उपक्रमांमध्ये समूह योगदान देत आहे.राज्यात मलेरिया निर्मूलन आणि डेंग्यू नियंत्रणासाठी आतापर्यंत १६ हजार गावे आणि ९ हजार झोपडपट्ट्यांमध्ये उपक्रम राबविण्यात आले आहेत. २०३० पर्यंत महाराष्ट्र



मलेरियामुक्त करण्याचे उद्दिष्ट आहे. बांधकाम कामगारांसाठी राबविलेल्या उपक्रमांतर्गत आतापर्यंत ९० हजार कामगारांची नोंदणी झाली असून, १८० कोटी रुपयांहून अधिक शासकीय निधीचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

महिला सक्षमीकरण आणि शेतकरी समृद्धी

महिलांना घरमालकीचा हक्क मिळवून देण्यासाठी तसेच पदवीधर महिलांना कौशल्य प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येत आहेत. पुढील तीन वर्षांत ८०० हून अधिक महिलांना कौशल्य प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. कृषी क्षेत्रात १०० हून अधिक शेतकरी समूह सक्षम करून ५ हजारांहून अधिक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडविण्याचे नियोजन आहे. दुग्धव्यवसायातील ७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञान आणि पशुवैद्यकीय सेवांचा लाभ देण्यात येणार आहे.

जलसंधारण आणि पर्यावरण संवर्धन

नाशिक आणि बीड जिल्ह्यांत जलसंधारण, मृदसंधारण आणि भूजल पुनर्भरणाचे उपक्रम राबविण्यात आले असून, आतापर्यंत ३ हजार शेतकऱ्यांना त्याचा लाभ झाला आहे. नागपूर येथे एकात्मिक कचरा व्यवस्थापन उपक्रमांतर्गत २०२५-२६ मध्ये ३५ हजार ३०२ मेट्रिक टनांहून अधिक कचरा पुनर्वापरासाठी वळविण्यात आला आहे. हरित बांधकाम साहित्य आणि प्लास्टिकला पर्यायी साहित्य विकसित करण्यासाठीही संशोधन व नवकल्पनांना प्रोत्साहन दिले जात आहे.

शासन आणि उद्योग क्षेत्राच्या समन्वयातून सामाजिक विकास, आर्थिक सक्षमीकरण आणि पर्यावरण संवर्धनाला चालना देणारे हे उपक्रम महाराष्ट्राच्या शाश्वत विकासाच्या दिशेने महत्वपूर्ण योगदान देणारे ठरणार आहेत.

थोडक्यात

नागपूर महापालिका क्षेत्रात रमाई आवास योजनेच्या उद्दिष्टांची १०० टक्के पूर्तता

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर महानगरपालिका क्षेत्रात सन २०२५-२६ या वर्षासाठी रमाई आवास घरकुल योजनेच्या (शहरी) उद्दिष्टांची १०० टक्के पूर्तता झाली आहे. या अंतर्गत एकूण २ हजार ८ प्रस्तावांना मंजुरी मिळाली आहे. या योजनेचा जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळावा व त्या दृष्टीने प्रशासनाने कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला दिले होते. सामाजिक न्याय विभागाच्या या योजनेद्वारे अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील नागरिकांना हक्काचे घर उपलब्ध करून दिले जाते. जिल्हास्तरावर सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयामार्फत ही योजना राबवली जाते.

शासनाकडून नागपूर महानगरपालिका क्षेत्रासाठी सन २०२५-२६ या वर्षाकरिता २ हजार घरकुलांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्याच्या दृष्टीने नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त नागरिकांनी योजनेचा लाभ घ्यावा, यासाठी सर्व दहा प्रभागांमध्ये २३ फेब्रुवारी २०२६ ते २७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले. त्यासाठी प्रत्येक वस्तीत जाऊन माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले तसेच जनमाध्यमांचा वापर करून नागरिकांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात आली. या शिबिरांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. प्रभागनिहाय प्राप्त अर्जांमधील कागदपत्रांची पडताळणी शासन निर्णयातील अटी व शर्तींनुसार करण्यात आली. त्यानंतर पात्र लाभार्थ्यांची यादी आणि प्रस्तावांना घरकुल निर्माण समितीमार्फत मंजुरी देण्यात आली. ही सर्व कार्यवाही समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण झाली. सन २०२५-२६ या वर्षात मंजूर झालेल्या एकूण २ हजार ८ प्रस्तावांसाठी सहाय्यक आयुक्त समाज कल्याण कार्यालयाकडून महानगरपालिकेस निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

प्रभागनिहाय पात्र लाभार्थी संख्या पुढीलप्रमाणे आहे : लक्ष्मीनगर प्रभाग क्रमांक १ मध्ये २८१, धरमपेठ प्रभाग क्रमांक २ मध्ये ३०१, हनुमान नगर प्रभाग क्रमांक ३ मध्ये २५०, धंतोली प्रभाग क्रमांक ४ मध्ये २०६, नेहरूनगर प्रभाग क्रमांक ५ मध्ये १४६, गांधीबाग प्रभाग क्रमांक ६ मध्ये १७४, सतरंजीपुरा प्रभाग क्रमांक ७ मध्ये २४७, लकडगंज प्रभाग क्रमांक ८ मध्ये ५२, आशीनगर प्रभाग क्रमांक ९ मध्ये २२३ आणि मंगळवारी प्रभाग क्रमांक १० मध्ये १२८ असे मिळून एकूण २ हजार ८ पात्र प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. या योजनेसाठी लाभार्थी अनुसूचित जाती किंवा नवबौद्ध घटकातील असणे, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला (वार्षिक कौटुंबिक उत्पन्न मर्यादा कमाल ३ लाख रुपये), अर्जदाराच्या नावावर स्वतःची मोकळी जागा अथवा कच्चे झोपडे असणे, घराची कर पावती व जागा मालकीचे पुरावे असणे आणि अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही गृहनिर्माण योजनेचा लाभ घेतलेला नसणे या अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नागपूर व महानगरपालिका नागपूर कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने ही १०० टक्के उद्दिष्टपूर्तीची कार्यवाही पूर्ण झाली.

पारधी समाजाला विकासगंगा! ३० कोटींचा विशेष पॅकेज मंजूर, लाभार्थ्यांचा १०० टक्के हिस्सा सरकार भरणार

दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई

महाराष्ट्रातील पारधी समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासासाठी राज्य सरकारने मोठे पाऊल उचलले आहे. आदिवासी विकास विभागाने पारधी समाजासाठी विशेष पॅकेज लागू करण्याचा शासन निर्णय (जीआर) आज ४ नोव्हेंबर रोजी जारी केला आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये तब्बल ३० कोटी रुपयांचा प्रारंभिक निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. या विशेष पॅकेजमध्ये दोन प्रमुख घटकांसाठी निधी राखीव ठेवण्यात आला आहे. वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या योजनांसाठी (न्यूक्लियस बजेट) २० कोटी रुपये तर ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत मूलभूत सुविधांसाठी १० कोटी रुपये देण्यात आले आहेत.

लाभार्थी हिस्सा आता सरकार भरणार

पारधी समाजातील अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणीमुळे शासकीय योजनांमधील लाभार्थी हिस्सा भरता येत नव्हता. ही अडचण दूर करण्यासाठी सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. वैयक्तिक योजनांसाठी कमाल ५० हजार रुपयांपर्यंत आणि सामूहिक योजनांसाठी कमाल ७ लाख ५० हजार रुपयांपर्यंत १०० टक्के लाभार्थी हिस्सा आता सरकार भरणार आहे. कृषी, पशुपालन, मत्स्यपालन, कुक्कुटपालन, ई-रिक्षा, मिनी ट्रक आणि महिला बचत गटांच्या योजनांचा यात समावेश आहे.

वस्त्यांमध्ये पाणी, रस्ते आणि पथदिवे

ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत पारधी बेडे आणि वस्त्यांमध्ये शुद्ध पिण्याचे पाणी, फिल्टर प्लांट, बोअरवेल, सबमर्सिबल पंप, जुन्या विहिरींची दुरुस्ती व खोलीकरण, पक्के रस्ते, सौरऊर्जेवरील पथदिवे आणि मुख्य रस्त्यांशी जोडणी यांसारख्या मूलभूत सुविधांना प्राधान्य दिले जाणार आहे.

कागदपत्रांसाठी विशेष शिबिरे

पारधी कुटुंबांकडे आवश्यक कागदपत्रे नसल्यामुळे अनेक योजनांचा लाभ मिळत नाही. यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, जात प्रमाणपत्र, आयुष्मान कार्ड, मनरेगा जॉब कार्ड आणि बँक खाते उघडण्यासाठी विशेष दस्तऐवज शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. आरोग्य तपासणी शिबिरे, रात्रशाळा, बालसंस्कार केंद्रे आणि प्रौढ शिक्षण कार्यक्रमही राबविण्यात येणार आहेत. पोलीस प्रशासन आणि पारधी समाज यांच्यातील गैरसमज दूर करण्यासाठी विशेष प्रबोधन कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. वनहक्क कायद्यांतर्गत लाभ, भूमिहीन कुटुंबांचे अधिकार आणि १ जानेवारी २०११ पर्यंतच्या पात्र निवासी अतिक्रमणांच्या नियमितीकरणात सहकार्य करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या (आयटीडीपी) प्रकल्प अधिकाऱ्यांना कार्यालयांमध्ये विशेष माहिती कक्ष सुरू करून योजनांची माहिती पोहोचविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. योजना अंमलबजावणीत विधवा, परित्यक्ता, दिव्यांग आणि एकल महिलांना प्राधान्य देण्याची तरतूदही आहे. आदिवासी समशेर सिंह पारधी विकास संघटनेचे अध्यक्ष अनिल पवार म्हणाले, 'सरकारने ३० कोटींच्या विशेष पॅकेजची घोषणा करून महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. मात्र या निर्णयाचे खरे यश प्रत्यक्ष पारधी वस्त्यांपर्यंत निधी आणि योजनांचा लाभ पोहोचण्यात आहे. आजही अनेक कुटुंबे मूलभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि जमीन हक्कांपासून वंचित आहेत. पारदर्शक आणि वेळेवर अंमलबजावणी आवश्यक आहे.

दोन पायांनी उभे राहण्याची जिद्द... जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आधार!

रेल्वे क्लब चौकात मदतीच्या प्रतीक्षेत बसलेल्या हरिदासला मिळाली नवी दिशा; नव्या कोऱ्या स्कुटीवरून आता करणार डिलिव्हरी बॉयचे काम

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

परिस्थितीने दोन्ही पाय हिरावून घेतले, पण स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे स्वप्न मात्र हिरावून घेता आले नाही. पोटाची खळगी भरण्यासाठी हैदराबादहून नागपूर गाठले. हाताला काम मिळेल, चार पैसे कमावता येतील आणि कोणापुढेही मदतीसाठी हात पसरावा लागणार नाही, अशी एक छोटीशी आशा मनात होती. मात्र, दिव्यांगत्वामुळे रोजगाराचे दरवाजे उघडत नव्हते. अखेर रेल्वे क्लब चौकात एका सहकाऱ्यासोबत मदतीच्या प्रतीक्षेत दिवस काढण्याची वेळ आली. अशाच एका दिवशी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नजर हरिदास बिरादर याच्यावर पडली आणि त्याच्या आयुष्याला नवे वळण मिळाले.

हरिदासचे वय अवघे ३४ वर्षे. घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची. वडील ऑटो चालवतात, तर आई दुसऱ्यांच्या घरी धुणीभांडी आणि घरकाम करून संसाराला हातभार लावते. अशा परिस्थितीत कुटुंबावर ओझे



होण्यापेक्षा स्वतःच्या हिमतीवर काहीतरी करून दाखवावे, या जिद्दीने तो रोजगाराच्या शोधात नागपूरला आला. मात्र, दोन्ही पायांनी दिव्यांग असल्याने काम मिळविण्यासाठी त्याला पदोपदी अडचणींचा सामना करावा लागला. अपेक्षित रोजगार न मिळाल्याने काही दिवस लोकांनी स्वेच्छेने केलेल्या मदतीवर गुजराण करावी लागली.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद विविध कामानिमित्त रेल्वे क्लब चौकातून जात असत. तेव्हा हरिदास अनेकदा त्यांच्या नजरेस पडायचा. मात्र, एका दिवशी त्यांनी केवळ गाडीतून पाहून पुढे जाण्याऐवजी आपली गाडी थांबवली. खाली उतरून त्याच्याजवळ गेले. त्याची आस्थेने चौकशी केली. त्याच्या अडचणी जाणून घेतल्या. संवाद साधताना हरिदासच्या बोलण्यातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली, ती म्हणजे त्याला केवळ आर्थिक मदत नको होती, तर स्वतःच्या कष्टाने जगण्याची संधी हवी होती.

हरिदासने एका सहकाऱ्याच्या मदतीने डिलिव्हरी बॉयचे काम करण्याची इच्छा व्यक्त केली. मात्र, त्यासाठी दुचाकी आवश्यक होती. त्याची ही गरज आणि स्वावलंबी होण्याची जिद्द जिल्हाधिकाऱ्यांच्या मनाला भिडली. त्यांनी त्याला मदतीचे आश्वासन दिले. दिलेला शब्द पाळत बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बोलावून हरिदासला नवी कोरी स्कुटी भेट दिली.

स्कुटीच्या चाव्या हातात पडल्या, तेव्हा हरिदाससाठी ती केवळ दुचाकी नव्हती. ती होती स्वतःच्या पायावर उभे राहण्याच्या स्वप्नाची पहिली पायरी! आजवर मदतीच्या प्रतीक्षेत बसणाऱ्या हातांना आता कष्टाने कमावण्याचा आधार मिळाला होता. जिल्हाधिकाऱ्यांच्या या संवेदनशील पुढाकारामुळे त्याच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद शब्दांपलीकडचा होता. 'आता स्वतःच्या हिमतीवर काम करून जगता येईल. कोणावर अवलंबून राहण्याची वेळ येणार नाही,' अशी भावना हरिदासने व्यक्त केली.

मदत नव्हे, जगण्याची संधी

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी हरिदासला केवळ आर्थिक मदत देऊन आपली जबाबदारी संपवली नाही. त्याच्या अडचणी समजून घेतल्या, त्याच्या मनातील स्वावलंबनाची इच्छा ओळखली आणि त्याला रोजगाराची वाट खुली करून दिली. मदतीसाठी थांबलेल्या एका तरुणाच्या हातात त्यांनी कष्टाने कमावण्याचे साधन दिले. एखाद्याच्या वेदना समजून घेण्यासाठी मोठे पद नव्हे, तर संवेदनशील मन लागते. त्यांच्या या कृतीतून माणुसकीचा हाच जिव्हाळा अधोरेखित झाला.

शरद पवार ब्रीच कँडी रुग्णालयात

मुंबई : राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांना आता पुन्हा एकदा रुग्णालयात दाखल करण्यात आले. शरद पवार यांना आज मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही दिवसांपूर्वी त्यांनी पुण्यातील रूबी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. तेथून सुटी मिळाल्यानंतर त्यांना आता ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही दिवसांपूर्वी शरद पवार यांना कफचा त्रास होत होता. त्यामुळे त्यांना सोमवारी पुण्यातील रूबी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दरम्यान उपचारानंतर त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला होता. मात्र त्यांना आता मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले की, शरद पवार यांना तपासणीसाठी ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.



फेब्रुवारीपर्यंत चारा टंचाईची शक्यता, आतापासूनच कायमस्वरूपी उपाययोजना करा!

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद : चारा लागवड, वैरण बियाणे वाटप व साठवणुकीचे नियोजन करण्याचे आदेश

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर जिल्ह्यात सध्या पशुधनासाठी सुमारे २६० ते २७० दिवस पुरेल एवढा चारा उपलब्ध आहे. मात्र, आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता फेब्रुवारीपर्यंतची गरज पूर्ण करण्यासाठी आतापासूनच चारा लागवडीसह कायमस्वरूपी उपाययोजना हाती घ्याव्यात, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील छत्रपती सभागृहात आयोजित चारा टंचाईविषयक आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. अर्चना कडू, पशुसंवर्धन विभागाचे जिल्हा उपायुक्त नितीन फुके उपस्थित होते. तसेच दूरदृश्यप्रणालीद्वारे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांच्यासह उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी आणि तालुका पशुसंवर्धन अधिकारी सहभागी झाले होते.

चारा लागवडीसाठी जमिनींची माहिती संकलित करा

चारा टंचाईवर मात करण्यासाठी संबंधित विभागांनी निश्चित केलेल्या नियोजनानुसार तातडीने कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले. डिसेंबर अखेरपर्यंत उपलब्ध होणाऱ्या गाळपेर क्षेत्राची गावनिहाय माहिती तसेच तलावांतील क्षेत्राची एकरनिहाय माहिती संकलित करून सादर करण्याच्या सूचना जलसंधारण, जलसंपदा आणि लघुपाटबंधारे विभागांना देण्यात आल्या.

चारा लागवडीसाठी योग्य असलेल्या महसूल विभागाच्या जमिनी, पडीक जमिनी आणि इतर उपलब्ध क्षेत्रांची माहिती तहसीलदारांनी तयार करावी. तालुका कृषी अधिकाऱ्यांनी गाळपेर क्षेत्र, गायरान क्षेत्र तसेच



महसुली पडीक जमिनींवर चारा लागवड करण्यास इच्छुक असलेल्या पशुपालक व शेतकऱ्यांची यादी तयार करून तहसीलदारांकडे सादर करावी. तालुका पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी गावनिहाय पशुधन संख्या, उपलब्ध चाऱ्याची स्थिती आणि भविष्यात चारा टंचाई उद्भवण्याची शक्यता असलेल्या गावांची यादी तयार करावी, असेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

वैरण बियाण्यांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करणार

वैयक्तिक लाभाच्या वैरण बियाणे योजनेव्यतिरिक्त शेतकरी गट किंवा महिला बचत गटांकडून अतिरिक्त बियाण्यांची मागणी आल्यास जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक मागणी सादर करावी, असे जिल्हाधिकारी म्हणाले. डीपीसीअंतर्गत वैरण बियाणे वाटपासाठी तालुका कृषी अधिकारी आणि तालुका पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी निर्धारित कार्यपद्धतीनुसार (एसओपी) निवडलेल्या लाभार्थ्यांना क्षेत्रीय स्तरावर बियाण्यांचे वितरण करावे. शेतकऱ्यांपर्यंत बियाणे वेळेत पोहोचेल, याची दक्षता घ्यावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

भविष्यात चारा टंचाई निर्माण झाल्यास खरेदी केलेल्या चाऱ्याची साठवणूक करण्यासाठी उपलब्ध गोदामांची माहिती संकलित करून सादर करावी. सुका आणि ओला चारा साठविण्यासाठी योग्य जागांची निश्चिती करताना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी समन्वय साधून कार्यवाही करावी, असे त्यांनी सांगितले.

१७३ संस्थांशी समन्वय साधून जनजागृती करा

चारा टंचाई व्यवस्थापनासाठी सर्व संबंधित विभागांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना वैरण बियाण्यांचे गावनिहाय वितरण करण्यासाठी संबंधित संस्थांनी पुढाकार घ्यावा. कृषी आणि पशुसंवर्धन विभागांनी चारा लागवड, वैरण बियाणे वाटप आणि शासनाच्या विविध योजनांबाबत व्यापक जनजागृती करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.

जिल्ह्यातील १७३ संस्थांच्या प्रतिनिधींशी तालुका कृषी अधिकारी, तहसीलदार आणि पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी बैठक घेऊन चारा उपलब्धता व नियोजनाबाबत चर्चा करावी. तसेच शुक्रवारी संध्याकाळपर्यंत सर्व संबंधित तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी संयुक्त बैठक घेऊन आवश्यक माहिती संकलित करावी आणि उपाययोजनांचे नियोजन पूर्ण करावे, असेही त्यांनी सांगितले.

पाणीटंचाई निवारणासाठीही गावनिहाय आराखडे तयार करा

चारा टंचाईबरोबरच संभाव्य पाणीटंचाईच्या उपाययोजनां वरही जिल्हाधिकाऱ्यांनी भर दिला. प्रत्येक गावाचा पाणीटंचाई निवारण आराखडा तयार करून बंधाऱ्यांची आणि बोअरवेलची दुरुस्ती प्राधान्याने करावी. ग्रामपंचायतींना प्रत्यक्ष भेटी देऊन आराखड्यांची तपासणी करावी, तसेच सरपंच, उपसरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांशी चर्चा करून स्थानिक पातळीवरील अडचणी जाणून घ्याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. क्षेत्रीय भेटींचे छायाचित्रण आणि व्हिडीओच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या कामांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून जनजागृती करावी. चारा व पाणीटंचाईच्या संभाव्य संकटाला सामोरे जाण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि वेळेत कार्यवाही करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.